सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जागतिक बँक

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
## टप्पा २



# भागधारक सहभाग आराखडा

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष,
मुंबई, कृषी विभाग







# अनुक्रमणिका


**१. प्रकल्प परिचय ........ १**

१.१ प्रकल्पाचे उद्दिष्ट्ये: ........ १

१.२ प्रकल्प घटक: ........ १

१.३ प्रकल्प लाभार्थी ........ ५

१.४ अंमलबजावणी व्यवस्था: ........ ६

**२.भागधारक सहभाग आरखडा ........ ७**

२.१ उद्दिष्ट्ये: ........ ७

**३. भागधारक ओळख आणि विश्लेषण ........ ८**

३.१ कार्यपद्धती ........ ८

३.२ संभाव्यतः प्रभावित भागधारक ........ ९

३.३ वंचित व्यक्ती आणि गट ........ १०

३.४ इतर संबंधित भागधारक (Other Interested Parties): ........ ११

**४. सहभागी भागधारकांशी केलेल्या सल्लामसलतीचा सारांश ........ १२**

**५. भागधारक सहभागिता कार्यक्रम ........ १४**

५.१ भागधारकांच्या गरजा आणि सहभागाच्या पद्धतींचा सारांश ........ १४

५.२ भागधारक सहभागिता उपक्रमांचे वेळापत्रक: ........ १४

५.३ माहिती प्रसारण करण्याचे धोरण (Strategy for Information disclosure) ........ १६

५. ४ वंचित आणि असुरक्षित गटांसाठी धोरण ........ १८

५. ५ भागधारकांना अहवाल देणे ........ १९

**६. भागधारक सहभाग आराखडा (SEP) अंमलबजावणीसाठी संसाधने आणि जबाबदाऱ्या ........ १९**

६. १ संसाधने ........ १९

६. २ प्रकल्प अंमलबजावणी व्यवस्थापन यंत्रणेचे कार्ये आणि जबाबदाऱ्या ........ २०

६. ३ तक्रार निवारण यंत्रणा: ........ २३

६.४ सध्याची तक्रार निवारण यंत्रणा ........ २४

६. ५ तक्ता ३०: प्रस्तावित तक्रार निवारण यंत्रणा ........ २४

**७. सनियंत्रण अहवाल ........ २६**

७. १ भागधारक गटांना अहवाल देणे ........ २८

**८. परिशिष्ट १ भागधारक सल्लामसलतीचा सारांश ........ २८**

**तक्ता सूची**


| | |
|---|---|
| तक्ता १: टप्प्यानुसार भागधारकांशी संलग्नता आणि जबाबदार विभाग. | १४ |
| तक्ता २: : माहिती प्रसारण करण्याचे प्रस्तावित धोरण | १६ |
| तक्ता ३: पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) अंमलबजावणीसाठी संभाव्य आर्थिक बाबींचा तपशील | १८ |
| तक्ता ४: भागधारक सहभाग आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी भूमिका आणि जबाबदाऱ्या | २० |
| तक्ता ५: भागधारक सल्लामसलतांसाठी गाव-पातळीवरील कार्यशाळा- (डिसेंबर ११ ते २४, २०२४) | २७ |

## संक्षेप आणि परिवर्णी शब्द

AG-SUP – कृषी पर्यवेक्षक

ATMA – कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था

BTM – ब्लॉक तंत्रज्ञान व्यवस्थापक

CAO – मंडळ कृषी अधिकारी

CBO – समुदाय आधारित संस्था

CPGRAMS – केंद्रीकृत सार्वजनिक तक्रार निवारण आणि सनियंत्रण प्रणाली

DDM – जिल्हा विकास व्यवस्थापक

DIU – जिल्हा अंमलबजावणी कक्ष

DOA – कृषी विभाग, महाराष्ट्र सरकार

DPD – उप प्रकल्प संचालक

FPC – शेतकरी उत्पादक कंपनी

FPO – शेतकरी उत्पादक संघटना

GKVS – ग्राम कृषी विकास समिती

JDA – संयुक्त कृषी संचालक

LBM – लीड बँक व्यवस्थापक (यांना लीड जिल्हा व्यवस्थापक म्हणजे LDM म्हणून देखील ओळखले जाते)

MAVIM – महिला आर्थिक विकास महामंडळ

MIDH – एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

NABARD – राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक

MGNREGA – महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा

POCRA – नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

NGO – स्वयंसेवी संस्था

PD – प्रकल्प संचालक

PMU – प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

POCRA – हवामान अनुकूल कृषी प्रकल्प

RAMETI – प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था

RIU - प्रादेशिक अंमलबजावणी कक्ष

RKVY - राष्ट्रीय कृषी विकास योजना

SAO - अधीक्षक कृषी अधिकारी

SARPANCH- सरपंच (म्हणजे ग्रामपंचायतीचे प्रमुख)

SHG - स्वयंसहायता गट

TAO - तालुका कृषी अधिकारी

VANAMATI - वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था

## १. प्रकल्प परिचय

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा -२ हा महाराष्ट्र राज्यातील कृषि हवामान अनुकूल संजीवनी प्रकल्प टप्पा असून, प्रकल्पाचा उद्देश हा हवामानातील बदल आणि कृषी क्षेत्रातील सामाजिक-आर्थिक असुरक्षितता यांच्यामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हवामान-आधारित कृषी पद्धतींना प्रोत्साहन देणे आहे. जागतिक बँक अर्थसहाय्यित प्रस्तुत प्रकल्पाचा टप्पा-२ हा टप्पा-१ वर आधारित आहे. (सदर टप्पा-१ हा जगतीक बँक अर्थसहाय्याने माहे मे २०१८ ते जून २०२४ या कालावधीमध्ये राबविण्यात आलेला होता) आणि यामध्ये नवीनतम कृषि पद्धती वापर करण्यासाठी शेतकरी, गावसमुह व भागधारकांचा सहभागातून प्रकल्पाची व्याप्ती वाढवण्याचे नियोजन केलेले आहे.

### १.१ प्रकल्पाचे उद्दिष्ट्ये:

प्रकल्प विकास उद्दिष्ट्य (PDO)

महाराष्ट्र राज्यातील निवडक प्रकल्प जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलास अनुसरून कृषि पद्धतीचा अवलंब करण्यासाठी सक्षम करून त्यांच्या शेतीची किफायतशीरता वाढवणे हे प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे .तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ चा उद्देश हा हवामान बदलामुळे विविध घटकांचा शेतीवर होणाऱ्या प्रतिकूल परिणाम कमी करणे आणि महाराष्ट्रातील निवडलेल्या जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यासाठी शेतीमध्ये किफायतशीरता निर्माण करणे असून प्रकल्पाच्या मागील टप्प्यामध्ये हवामान अनुकूल तंत्रज्ञान आणि कृषि पद्धतीचा अवलंब केल्यामुळे शेतकऱ्यांना स्थिर आणि वाढीव पिक उत्पादन प्राप्त झालेले आहे.

शेतकऱ्यांची शेती फायदेशीर आणि टिकाऊ बनवण्यासाठी नैसर्गिक आणि बाहेरील संसाधनांचा वापर अधिक कार्यक्षमतेने करण्याची गरज आहे. यामुळे परिसरातील नैसर्गिक व्यवस्था अधिक मजबूत होईल. तसेच, शेतीमध्ये सुधारित पद्धती वापरून ग्रीनहाऊस वायूंचे उत्सर्जन (GHG emissions) कमी करायचे आहे, जेणेकरून आपली शेती इतर पारंपरिक शेतीच्या तुलनेत कमी प्रदूषण करणारी आणि फायदेशीर ठरेल. 'उत्सर्जन स्पर्धात्मकता' म्हणजे पारंपरिक शेतीच्या तुलनेत सुधारलेल्या पद्धतींमुळे ग्रीनहाऊस वायूंच्या उत्सर्जनात घट करणे अपेक्षित आहे .

तसेच प्रकल्पातील कामाच्या नियोजनाकरिता उपलब्ध माहितीवर आधारित निर्णय घेण्यासंदर्भात माहिती आधारित निर्णय प्रणाली तयार करून पुढील नियोजन व मार्गदर्शन केले जाईल.

### १.२ प्रकल्प घटक:

प्रस्तुत प्रकल्पाचा उद्देश हा नैसर्गिक आणि बाह्य संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि अचूक शेती पद्धती च्या वापराद्वारे कर्ब उत्सर्जन कमी करून शाश्वत उत्पादन प्रणाली निर्माण करणे आहे. ज्यामुळे निविष्ठा व शेती उत्पादन खर्च कमी करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, पिकांची उत्पादकता वाढवून शेतकऱ्यांचा नफा वाढवणे आहे. कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची स्थिरता ही चिंतेची बाब असल्याने प्रकल्पातील सर्व

घटकांवर लक्ष केंद्रित करून उत्पन्न स्थिरते करिता  शेतकरी, गट, स्वयं सहायता गट यांचे सोबत कामाचा विस्तार वाढवणे, क्षमतावृद्धी द्वारे उत्पादन व मूल्य साखळ्या मजबूत करणे आणि कृषी व्यवसायाच्या संधी निर्माण करण्याचे नियोजित आहे.

तसेच प्रकल्प अंमलबजावणी करिता तयार करण्यात आलेली संस्थात्मक रचना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने आणि प्रकल्पाच्या उद्देशपूर्ती करिता आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान विविध भागीदारांच्या मदतीने घेतले जाईल.

या प्रकल्पाची रचना खालील पुढील भागांमध्ये केलेली आहे:

**अ. संसाधनांचा कार्यक्षम वापर करून उत्पादकता वाढवणे.**

**ब. ग्रीनहाऊस वायूंचे उत्सर्जन कमी करण्यासाठी अचूक शेतीला प्रोत्साहन देणे.**

**क. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सुधारणा करणे आणि ते स्थिर करणे.**

**ड. प्रकल्प व्यवस्थापन आणि संस्थात्मक क्षमता वाढवणे.**

**घटक अ: कमी खर्चात जास्त उत्पादन**

हवामान अनुकूल आणि कमी खर्चावर आधारित कृषी उत्पादकता प्रणाली तयर करण्याकरिता जमिनीचे आरोग्य सुधारणे (FUE), **खतांचा कार्यक्षम वापर** आणि **पाण्याचा कार्यक्षम वापर** यावर लक्ष केंद्रित करण्यात येते. हे सर्व बदल कमी कर्ब उत्सर्जन करणाऱ्या हवामान अनुकूल तंत्राद्वारे करण्यात येते. उपलब्ध संसाधने, हवामान अनुकूल पद्धती आणि प्रकल्पातील विविध घटकांची माहिती उपलब्धता आधारित प्रणाली (data-driven systems) आणि डिजिटल तंत्राद्वारे केवळ उत्पादन वाढीवर भर न देता शेतीत वापरल्या जाणाऱ्या गोष्टींचा (खते, पाणी इत्यादी) अनावश्यक वापर टाळण्यावर लक्ष दिले जाईल. यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब (soil organic carbon) वाढवणे आणि जमिनीच्या प्रकारानुसार खतांचा वापर करणे (site-specific nutrient management) यावर विशेष लक्ष दिले जाईल. यासाठी योग्य सल्ला देण्यासाठी आणि जमिनीची तपासणी करण्यासाठी तज्ञांची मदत घेतली जाईल.

**उपघटक अ१: उत्पादन प्रणालीची कार्यक्षमता वाढवणे.**

अत्याधुनिक तंत्रज्ञान द्वारे उपग्रहावर आधारित सल्ला सेवाच्या माध्यमातून जमिनीचे आरोग्य सुधारणे, सुधारित खत व्यवस्थापन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी शेतीच्या प्रात्यक्षिका वर आधारित शेतकऱ्यांना मदत केली जाते. यासोबतच जमिनीचे धूप थांबवणे, नैसर्गिक खते आणि सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढवण्यावर भर देवून जमीन आरोग्य निर्देशांक तयार करण्यात येणार आहे. सदर निर्देशाकांमार्फत जमिनीमध्ये काय सुधारणे करणे आवश्यक आहे याबद्दल नियोजन करणे सोपे होईल.

**उपघटक अ२: पाणी-वापर कार्यक्षमता वाढवणे.**

प्रकल्प क्षेत्रातील उपलब्ध पाण्याचे आणि पावसाद्वारे उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणे तसेच शेतकऱ्यांचा सहभागातून माती, पाणी जतन करण्याच्या कामांचे नियोजन करून भूजल

व्यवस्थापनासाठी तांत्रिक संस्थांच्या भागीदारी मार्फत सिंचनाचे वेळापत्रक आणि डिजिटल साधनांच्या वापर करण्यात येणार असून यासाठी पाणी साठवण क्षेत्राची देखभाल, भूभार्गातील पाण्याची पातळी वाढवणे, सूक्ष्म सिंचन, पाणी साठवण आणि पाणी वाचवणारे शेतीमधील बदल यावर आधारित बदलात्या हवामानास तोंड देणारी हवामान अनुकूल पाणी व्यवस्थापन प्रणाली तयार करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

**उपघटक अ३: हवामान बदलाला तोंड देण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर.**

बदलते हवामानाला सामोरे जाण्यासाठी अचूक शेती (precision farming) आणि माहिती व तंत्रज्ञानाचा (ICT-based solutions) वापर करून हवामानातील धोके कमी करणे, उत्पादन वाढवणे आणि कर्ब उत्सर्जन कमी करणे यावर भर दिला जाईल. यामध्ये शेतीवरील प्रात्याक्षिके, नवीन तंत्रज्ञान घेण्यासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करणे, बीज संवर्धन, डिजिटल माध्यमाद्वारे शेतीबद्दल माहिती आणि सल्ला सेवा या गोष्टींचा समावेश असेल:

**घटक ब: GHG उत्सर्जन व्यवस्थापनासाठी अचूक शेतीला प्रोत्साहन देणे**

कृषि क्षेत्रातील शेतकऱ्यांना हवामान अनुकूल शेती पद्धतीच्या अवलंब करण्यास प्रोत्साहन देवून पिक उत्पादन टिकवून ठेवून कमी मिथेन तयार होणारे भात लागवड, कार्बन जमिनीत साठवणे आणि पिक विविधतेसाठी शेतकऱ्यांना अचूक शेतीपद्धतीची ओळख करून देण्याच्या उद्देशाने कर्ब उत्सर्जन मोजणे, पडताळणी करणे व नोंद ठेवण्यासाठी डिजिटल प्रणाली विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच लहान शेतकऱ्यांसाठी कार्बन व्यापार (carbon-trading) हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर सुरू करेल.

**घटक ब १: मिथेन आणि भात उत्पादनात समतोल राखणे.**

प्रकल्पातील निवडलेल्या गावामधील शेतीमधील मिथेनचे उत्सर्जन कमी करण्यासाठी भाताची थेट पेरणी (Direct Seeded Rice - DSR), भात लागवडीची सुधारित पद्धत (System of Rice Intensification - SRI) आणि आलटून पालटून ओले आणि कोरडे सिंचन (Alternate Wet and Dry - AWD) यांसारख्या अचूक तंत्रज्ञानाचा वापर प्रायोगिक स्तरावर केला जाईल.

तसेच भागीदार संशोधन संस्थांच्या मदतीने शेतकऱ्यांची क्षमता वाढवली जाईल आणि टिकाऊ भात उत्पादनासाठी शेतकऱ्यांच्या गटांना एकत्र काम करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. तसेच, उत्सर्जन आणखी कमी करण्यासाठी प्रात्यक्षिकासह पर्यायी पिकांवर शेतकऱ्यांच्या सहभागातून संशोधन केले जाईल.

**घटक ब २: शेतीत ऊर्जा वापर कमी करणे.**

नवीकरणीय ऊर्जा स्रोतांच्या (सौर उर्जा) वापरा प्रोत्साहन देवून सिंचन व्यवस्था व इतर कामासाठी त्याचा वापर करणे तसेच, शेतीमधील सेंद्रिय व टाकाऊ वस्तूपासून (biomass) ऊर्जा तयार करण्यासाठी मदत केली जाईल.याचा उद्देश शेतातील कचरा जाळणे कमी करणे आणि शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळवून देणे हा आहे.

**घटक ब ३: कार्बन साठवणुकीसाठी पीक विविधतेला प्रोत्साहन.**

प्रचलित पिक पद्धतीबरोबरच शेतकऱ्यांना कडधान्ये, जास्त किमतीची पिके आणि भरड धान्ये घेण्यास प्रोत्साहन देणे व याकरिता प्रकल्प गावातील शेतकऱ्यांसाठी प्रात्यक्षिके आणि प्रोत्साहनपर योजना राबविण्यात येतील. विशेषतः दुष्काळग्रस्त भागांमध्ये कार्बन साठवणूक, जैवविविधता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी कृषी वनीकरण (agroforestry), बांबू लागवड आणि फळबाग लागवड यांसारख्या कामांना प्रोत्साहन दिले जाईल.

**घटक क : शेतीमधील उत्पन्न वाढवणे आणि स्थिर करणे**

शेतकरी उत्पादक संघटनांना (FPOs) कृषी-व्यवसायाचे केंद्र आणि पुरवठा साखळीचे प्रमुख म्हणून अधिक मजबूत करण्यात येईल आणि त्याद्वारे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि ते स्थिर ठेवण्यासाठी कृषी-व्यवसाय मॉडेल आणि उत्पन्न मिळवून देणाऱ्या कामांना मदत केली जाईल. यात महिला आणि उपेक्षित शेतकऱ्यांवर विशेष लक्ष दिले जाईल व शेतकरी गटांना तंत्रज्ञान आणि कृषी-व्यवसायाच्या उपायांसाठी आर्थिक मदत दिली जाईल.

**घटक क १: कृषी-व्यवसाय पुरवठा मूल्य साखळ्या मजबूत करणे.**

अल्पभूधारक शेतकऱ्यांची बाजारात स्पर्धा करण्याची क्षमता आणि बाजारपेठेत पोहोच वाढवण्यासाठी कार्यक्षम बाजार व्यवस्था, डिजिटल बाजार सेवा आणि पुरवठा साखळीतील व्यवहारांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

**घटक क २: कृषी-व्यवसाय विकास केंद्र.**

प्रकल्पाच्या मागील टप्प्यामध्ये तयार केलेल्या डिजिटल प्रणालीद्वारे पिके काढणी पश्चात शेतमाल प्रक्रिया करणे, शेतमालाचे एकत्रिकरण, बाजारपेठेशी जोडणी यासोबतच, मत्स्यपालन आणि रेशीम उद्योग यांसारख्या संलग्न क्षेत्रांमध्ये कृषी उद्योजकता क्षेत्रामध्ये आवश्यक सोयीसुविधा निर्माण करण्यावर भर दिला जाईल. शेतकऱ्यांना स्मार्ट कृषी-व्यवसायासाठी तयार करण्यासाठी व्यवसाय नियोजन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सेवांसाठी क्षमता विकास केला जाईल.

**घटक ड: प्रकल्प व्यवस्थापन आणि संस्थात्मक बळकटीकरण**

प्रकल्पांतर्गत गावामध्ये हवामान अनुकूल शेती पद्धती करिता माती, पाणी आणि खतांचा कार्यक्षम वापर तसेच हवामान बदलाला तोंड देण्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी खाजगी क्षेत्र आणि सामाजिक संस्था यांना तांत्रिक आणि सल्लागार म्हणून सहभागी केले जाईल आणि वैज्ञानिक आणि तांत्रिक तज्ञांचे गट (consortia) तयार करून संस्थात्मक रचना अधिक मजबूत केली जाईल.

**उपघटक ड १: वैज्ञानिक आणि तांत्रिक तज्ञांचे गट.**

प्रकल्पांतर्गत विविध क्षेत्रांतील तज्ञांचे गट तयार करून कमी खर्चात जास्त उत्पादन, सिंचन आणि हवामानाशी जुळवून घेण्याच्या पद्धतींबाबत मार्गदर्शन करणे आणि कार्यक्षमता वाढीकरिता संशोधन यासाठी नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा (Innovation Lab) देखील स्थापन करण्यात येणार आहे.

**उपघटक ड २: हवामान अनुकूल शेतीसाठी डिजिटल सेवा.**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), उपग्रह प्रतिमा आणि ब्लॉकचेन यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रकल्पाकरिता विकास केला जाईल आणि शेतीची माहिती वेळेवर मिळवणे, भविष्यातील अंदाज वर्तवणे आणि पुरवठा साखळीचा शोध घेण्यात येईल व डिजिटल प्रणाली द्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार वैयक्तिक सल्ला सेवा व जलद आणि कार्यक्षम निर्णय घेण्यासाठी नियोजन करण्यात येईल.

**उपघटक ड ३: प्रकल्प देखरेख, मूल्यांकन आणि शिकणे.**

प्रकल्पाच्या कालावधीमध्ये पारदर्शकता आणि सुधारणा करण्याकरिता आणि प्रकल्पाच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्याचे मूल्यमापन करण्यासाठी एक सुलभ व सक्षम प्रणाली तयार केली जाईल. यांच्या वापरातून माहितीचे व्यवस्थापन, लोकांपर्यंत माहिती पोहोचवणे आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी केला जाईल.

**१.३ प्रकल्प लाभार्थी**

सदर प्रकल्प महाराष्ट्रातील समूह असुरक्षितता निर्देशांका अंतर्गत निश्चित केलेल्या निकषांनुसार, राज्यातील २१ निवडक जिल्ह्यांमधील ७,१९६ गावांमध्ये राबविण्यात येणार आहे, या २१ जिल्ह्यांपैकी १९ जिल्हे विदर्भ आणि मराठवाड्यातील आहेत, जिथे हवामान बदलाचा शेतीवर जास्त धोका आहे. तसेच प्रकल्पाचा थेट फायदा लहान आणि अल्प भूधारक शेतकरी, महिला स्वयं सहायता गट, शेतकरी गट, आदिवासी बहुल क्षेत्रातील सुमारे २.३ दशलक्ष शेतकऱ्यांना लाभ मिळणे अपेक्षित आहे. प्रकल्प गावातील अल्प भूधारक शेतकऱ्यांना शेतीमध्ये हवामान अनुकूल  पद्धतीचा अवलंब करण्यासाठी माहिती, ज्ञान आणि तंत्रज्ञानाद्वारे उपलब्ध होईल. यामुळे त्यांच्या शेतीत हवामानाशी जुळवून घेण्याची क्षमता वाढेल, संसाधनांचा कार्यक्षम वापर होईल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे पर्यावरणाचेही अनेक फायदे साधले जातील. तसेच ह्या प्रकल्पाद्वारे जिल्हा आणि तालुका स्तरावरील सरकारी यंत्रणा, भागीदार संस्था, गट आणि कंपन्या यांना हवामान अनुकूल तांत्रिक आणि कृषी पूरक सेवा पुरविण्यास प्रकल्पाकडून समन्वयातून मार्गदर्शन केले जाईल.

**प्रकल्पाचे क्षेत्र :** महाराष्ट्रातील  तीन विभागातील २१ जिल्ह्यांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी होणार आहे.

**मराठवाडा**: यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यांचा समावेश आहे.

**विदर्भ**: यामध्ये अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीचा समावेश आहे.

**उत्तर महाराष्ट्र** : यामध्ये नाशिक आणि जळगावचा समावेश आहे.

प्रकल्पातील वरील विभाग हे दुष्काळ, अवर्षण प्रवण क्षेत्र, सामाजिक व आर्थिक अडचणी, हवामान बदलामुळे होणारे धोके, सिंचनाची सोय, पावसाचे प्रमाण, भूगर्भातील पाण्याची उपलब्धता आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, लिंगभेद यांसारख्या सामाजिक-आर्थिक घटकांचे निर्देशाकांचे सखोल विश्लेषण करून जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे.

### १.४ अंमलबजावणी व्यवस्था:

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ चा कालावधी ६ वर्षांचा असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील (२०१८-२०२४) केलेल्या कार्यावर आधारित आहे. प्रस्तुत प्रकल्पा टप्पा-२ मागणी-आधारित आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या हस्तक्षेपांना आणि दीर्घकालीन परिणामांना सुनिश्चित करण्याचे नियोजन केलेले आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी प्रशासन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणी या तीन स्तरांवर करण्याचे नियोजित आहे. यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून प्रशासकीय संरचनेत अखंड एकत्रीकरण सुनिश्चित करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या उद्दिष्टपूर्ती करिता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प सुकाणु समिती, (Project Steering Committee) ही प्रकल्पाच्या एकूण प्रशासकीय बाबींसाठी जबाबदार असेल, यामध्ये प्रकल्पास संकल्पनात्मक आणि धोरणात्मक मार्गदर्शन करणे, प्रकल्पाचे वार्षिक बजेट आणि राबविण्याच्या कार्यपद्धती बद्दल सविस्तर चर्चा करणे, मान्यता देणे आणि आंतर-विभागीय समन्वयास समर्थन करणे इत्यादी बाबी समाविष्ट आहेत.

तसेच विद्यमान प्रकल्प संचालक हे प्रकल्प टप्पा २ आणि प्रकल्प व्यवस्थापन कक्ष यांच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी जबाबदार असतील, यामध्ये दैनंदिन अंमलबजावणी बाबींचे पर्यवेक्षण, विविध भागीदार एजन्सींमधील समन्वय, वित्तीय आणि कायदेशीर व्यवस्थापन बाबी, सुरक्षा मानकांचे पालन, सनियंत्रण आणि परिणाम मूल्यांकन तसेच प्रकल्पाविषयी संवाद साधने इ. समावेश असेल. प्रकल्पाची अंमलबजावणी विभाग, जिल्हा, उपविभाग, तालुका, समूह आणि गाव पातळीवर केली जाईल. यासाठी पाच विभागीय कृषी सहसंचालक (JDA) आपापल्या विभागातील जिल्ह्यांमध्ये समन्वय साधतील.

### जिल्हास्तर:

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हे प्रकल्प संचालक (आत्मा) यांचे समन्वयातून २१ जिल्हे, ५५ उपविभाग आणि २२४ तालुक्यामधील प्रकल्प विषयक कामांचे जिल्हास्तरीय अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करतील, वित्तीय सहाय्य पुरवतील, समूह विकास आणि गाव अनुकूलन योजनांवर चर्चा करतील, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्थेशी (Agriculture Technology Management Agency - ATMA) समन्वय साधतील आणि जिल्हा स्तरावरील विभाग आणि समूह स्तरादरम्यान एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करतील. प्रकल्पातील ATMA कार्यालये सोबत विस्तार सहाय्य पुरवणे, जिल्हा स्तरावर शेतकरी आणि FPO च्या प्रशिक्षण गरजांचे मूल्यांकन करणे आणि विभाग स्तरावर शेतकरी प्रशिक्षण तसेच तंत्रज्ञान प्रसारास चालना देण्यासाठी आणि गाव क्लस्टर स्तरावर हवामान अनुकूलन योजनांची निर्मिती सुनिश्चित करण्यासाठी कार्य करतील.

तसेच प्रकल्प अंमलबजावणी करिता तांत्रिक मार्गदर्शन, मान्यता देणे, गाव समूह स्तरावर कामांच्या खरेदी पद्धती सनियंत्रित करणे इत्यादी जबाबदाऱ्या असतील. तसेच प्रकल्प गावस्तरावरील समूह सहाय्यक (CAs) आणि ग्राम कृषी विकास समिती (GKVS) हे सर्वात महत्त्वाचे दुवे असल्याने त्यांचे मार्फत लाभार्थ्यांची निवड करणे आणि गावातील सामूहिक कामांचे नियोजन यांसारख्या महत्वाची कामे पूर्ण करतील.

प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणी करिता आणि विविध टप्प्यावरील यशस्वीतेकरिता आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य मिळवण्यासाठी राज्य कृषी विद्यापीठे (State Agriculture Universities - SAUs), ICAR-NBSS&LUP आणि इतर संशोधन संस्थांसारख्या तज्ज्ञ संस्थांबरोबर सामंजस्य करार (MoU) केले जातील.

**२.भागधारक सहभाग आरखडा**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २ जागतिक बँकेच्या पर्यावरण आणि सामाजिक संरचनेच्या (Environment and Social Framework - ESF) मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केला आहे. प्रामुख्याने, पर्यावरणीय आणि सामाजिक मानक ESS१० (भागधारक सहभाग आणि पारदर्शकपणे सर्वांसाठी माहिती उपलब्ध करून देणे) याचे कठोरपणे पालन करण्यास कृषी विभाग (DOA) कटिबद्ध आहे. यानुसार, कृषी विभाग प्रकल्पाशी संबंधित सर्व भागधारकांना वेळेत, सबंधित, समजण्याजोगी आणि सहज उपलब्ध होईल अशी माहिती देईल. तसेच, त्यांच्यासोबत सांस्कृतिकदृष्ट्या योग्य पद्धतीने समन्वय साधून प्रकल्पाच्या सर्व स्तरांवर भागधारकांचा सक्रिय सहभाग वाढवणे हे प्रकल्पाचे उद्दिष्ट्यपूर्ती करिता आवश्यक आहे.

**२.१ उद्दिष्ट्ये:**

प्रस्तुत प्रकल्पातील प्रभावी अंमलबजावणीमध्ये जागतिक बँकेच्या पर्यावरण विषयक सामाजिक मानकांच्या (ESS) संबंधित धोरणांचा व निदेशकचा समावेश आहे. याकरिता पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) बाबत नियोजन केलेले आहे आणि त्यानुसार भागधारक सहभाग आराखडा (एसईपी) विकसित केला गेला आहे. तसेच सदर आराखड्या मार्फत प्रकल्प समन्वय,अंमलबजावणी यंत्रणा व सर्व लाभधारक समावेश यांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रकल्प लाभार्थी, लहान शेतकरी, महिला बचत गट, शेतकरी गट, समुदाय नेते, शासकीय संस्था, गैर-सरकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रकल्पाच्या परिणामांमध्ये स्वारस्य असलेले संस्थात्मक सदस्य या भागधारकांचा समावेश आहे.

या भागधारक सहभाग आराखड्याचा (SEP) मुख्य उद्दिष्ट संपूर्ण प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान भागधारकांशी समन्वयातून सुसंवाद, माहिती आणि चर्चेद्वारे आराखडा तयार करणे हा आहे. सदर प्रक्रीयेमध्ये भागधारक प्रकल्पाबद्दल आणि त्यासंबंधित कोणत्याही कामांबद्दलन मत व्यक्त करू शकतात, अभिप्राय किंवा तक्रारी करू शकतात.

**भागधारक सहभाग आराखड्याच्या (SEP) विशिष्ट उद्दिष्टांमध्ये खालील बाबींचा समावेश आहे:**

- आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकारल्या जाणाऱ्या उत्तम पद्धतींनुसार (good practice) भागधारक सहभागासाठी मार्गदर्शन करणे.
- प्रकल्पाचा परिणाम होणारे किंवा प्रकल्पावर प्रभाव टाकणारे महत्त्वाचे भागधारका ओळखून त्यांच्या उपक्रमांविषयी महिती देणे.
- प्रकल्प माहिती सर्वसामान्यांना उपलब्ध करण्यासाठी आणि नियमित, सुलभ, पारदर्शक आणि योग्य

सल्लामसलत सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी पद्धती, वेळ आणि रचना निश्चित करणे.

- प्रकल्पाच्या नियोजनात आणि रचनेत (डिझाइनमध्ये) भागधारकांना आपले विचार मांडण्याची आणि प्रभाव टाकण्याची संधी मिळेल, असा एक प्रभावी भागधारक सहभाग आराखडा विकसित करण्यात येईल.
- औपचारिक तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करणे.
- भागधारक सहभाग आरखडा अंमलबजावणीसाठी भूमिका आणि जबाबदाऱ्या निश्चित करणे.
- भागधारक सहभाग आरखडा अपेक्षित लक्षांक साध्य करण्यासाठी, तसेच नियमित आढाव्यासाठी, अहवाल आणि सनियंत्रण पद्धती निश्चित करणे.
- भागधारक सहभाग आराखड्यामध्ये प्रकल्प पूर्वतयारी ते प्रकल्प अंमलबजावणीच्या टप्प्यांमध्ये विशेषतः शेतकरी, महिला शेतकरी, आदिवासी लाभार्थी आणि भूमिहीन यांवर लक्ष केंद्रित करून त्यांना प्रकल्पामध्ये सहभागी करून करण्याच्या पद्धतींवर विशेष भर देण्यात आला आहे.

## ३. भागधारक ओळख आणि विश्लेषण

### ३.१ कार्यपद्धती

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत, सर्व संबंधित भागधारकांची ओळख करणे, त्यांचे वर्गीकरण करणे आणि त्यांचा योग्य सहभाग सुनिश्चित करणे, यासाठी एक व्यापक पद्धत वापरली जात आहे. भागधारकांना प्रकल्पात सहभागी करून घेण्यासाठी अवलंबलेली कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे:

- **दस्तऐवज तपासणी (Desk Review):** प्रकल्पाशी संबंधित कागदपत्रे, प्रकल्प टप्पा-१ (PoCRA-I) प्रकल्पातील भागधारकांच्या सहभागाचे पूर्वीचे अनुभव, आणि निवडलेल्या जिल्ह्यांमधील लोकसंख्येच्या आकडेवारीचे सखोल विश्लेषण केले जाईल.
- सदर प्रकल्पासाठी **भागधारकांचे नकाशांकन (Stakeholder Mapping)** करण्यात आले आहे. यामध्ये , ज्यांच्यावर प्रकल्पाचा थेट परिणाम होणारे (**प्राथमिक भागधारक**) आणि ज्यांच्यावर अप्रत्यक्ष परिणाम होतो किंवा जे प्रकल्पावर प्रभाव टाकू शकतात (**दुय्यम भागधारक**) यांची ओळख करण्यात आली आहे. तसेच प्रभाव-रुची विश्लेषण (Influence-Interest Analysis) या पद्धतीनुसार, भागधारकांचा प्रकल्पावर असणारा प्रभाव आणि त्यांची स्वारस्य पातळी विचारात घेऊन त्यांचे वर्गीकरण केले जाते. यामुळे, त्यांच्यासाठी योग्य सहभाग धोरणे तयार करण्यास मदत होते.
- हवामान संवेदनशीलता निर्देशांक (Climate Vulnerability Index) : सदर प्रकल्पाने तयार केलेल्या समूह असुरक्षितता निर्देशांकाचा वापर करून, प्रकल्पाची क्षेत्रे करण्यात आली आहेत.
- क्षमता वाढवण्याची गरज मूल्यांकन (Capacity Enhancement Needs Assessment - CENA) भागधारक सहभाग आराखड्याची (SEP) आखणी क्षमता वाढवण्याच्या गरजेच्या मूल्यमापनावर (CENA) आधारित आहे. हे संशोधन भागधारकांच्या आणि त्यांच्या विशिष्ट गरजा ओळखण्यासाठी

करण्यात आले. CENA संशोधन निष्कर्षानुसार शेतकरी, महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, शेतमजूर, भूमिहीन व्यक्ती (असुरक्षित गट), युवा आणि गाव उद्योजक इत्यादी महत्व्याच्या घटकांसह समावेश विविध प्रकारच्या प्रशिक्षणांची शिफारस करण्यात आली.

- **प्रमुख भागधारकांशी सल्लामसलत** (Consultation with Key Informants): प्रकल्पाने गडचिरोली, यवतमाळ, जालना, धाराशिव आणि नाशिक यांसारख्या आदिवासी क्षेत्रांमधील थेट प्रकल्प लाभार्थ्यांशी सखोल चर्चा केली आहे. चर्चेदरम्यान प्रकल्प टप्पा २ ची उद्दिष्ट्ये आणि त्यातील मुख्य बाबी प्राथमिक भागधारकांना स्पष्ट करण्यात आल्या. प्रकल्पाचे संभाव्य पर्यावरणीय आणि सामाजिक परिणाम, भागधारकांची भूमिका, तसेच प्रकल्पासमोरील अडचणी आणि आव्हाने यावर त्यांचे अभिप्राय जाणून घेण्यात आले. या विचारविनिमयातून मिळालेल्या अभिप्रायाचा प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यात समावेश करण्यासाठी विचार करण्यात आला आहे.

**उत्तम कार्यपद्धतींचा अवलंब करण्यासाठी, प्रकल्प भागधारक सहभागासाठी खालील तत्त्वांचे पालन करेल:**

- **खुलेपणा आणि जीवनचक्र दृष्टिकोन** (Openness and Life-Cycle Approach) प्रकल्पांमध्ये सार्वजनिक चर्चा 'खुलेपणा आणि जीवनचक्र दृष्टिकोन' या तत्त्वानुसार राबवली जाईल. ही प्रक्रिया पूर्णतः खुली, निःपक्षपाती आणि कोणत्याही बाह्य शक्तींच्या दडपणापासून मुक्त राहील.

- **माहितीसह सहभाग आणि अभिप्राय** (Informed Participation and Feedback) : या तत्त्वानुसार, प्रकल्पाची सर्व आवश्यक माहिती भागधारकांना सोप्या भाषेत पुरवली जाईल आणि तिचा जास्तीत जास्त प्रसार केला जाईल. भागधारकांना त्यांचे मत, सूचना आणि समस्या मांडण्याची पूर्ण संधी दिली जाईल. प्राप्त झालेल्या सर्व सूचनांचे सखोल विश्लेषण करून त्यावर आवश्यक उपाययोजना केल्या जातील.

- **सर्वसमावेशकता आणि संवेदनशीलता** (Inclusiveness and Sensitivity): या दृष्टिकोनानुसार, उत्तम संवाद आणि सहकार्यासाठी भागधारकांची निश्चिती केली जाईल. प्रकल्पातील नियोजन आणि माहिती वाटपाची प्रक्रिया सर्वसमावेशक असेल. विशेषतः, भूमिहीन, अल्पभूधारक, महिला शेतकरी, अनुसूचित जाती-जमातीचे शेतकरी, वृद्ध आणि दिव्यांग व्यक्ती यांसारख्या असुरक्षित गटांना प्रकल्पाच्या लाभांपासून वंचित राहू नये म्हणून विशेष प्राधान्य दिले जाईल.

- **परिस्थितीनुरूप लवचिकता (Flexibility)** स्थानिक अडचणींमुळे जेव्हा प्रत्यक्ष भेटून संवाद साधणे शक्य होणार नाही, अशा वेळी डिजिटल आणि मोबाइल माध्यमांचा वापर केला जाईल.

### ३.२ संभाव्यतः प्रभावित भागधारक

प्रकल्पाचे निर्णय किंवा कृतींमुळे संभाव्यतः प्रभावित होणारे व्यक्ती, गट किंवा संस्था म्हणजे असे भागधारक ज्यांच्यावर थेट परिणाम न होताही दीर्घकालीन प्रभाव पडू शकतो.

वरील विश्लेषणानुसार, हे भागधारक बहुतांश सकारात्मक मार्गांनी प्रभावित होतील. यामध्ये प्रामुख्याने

खालील घटक समाविष्ट आहेत:

- **लहान आणि अल्पभूधारक शेतकरी:** विशेषतः ५ हेक्टरपर्यंत जमीन असलेले शेतकरी, जे प्रकल्पाचे मुख्य लाभार्थी असतील. (बिजोत्पादन घटकास जमीन धारणेची अट नाही)
- **महिला शेतकरी.**
- **शेतकऱ्यांचे समूह:** यामध्ये शेतकरी उत्पादक संघटना (FPOs), शेतकरी उत्पादक कंपन्या (FPCs), स्वयं-सहायता गट (SHGs) आणि हवामान-अनुकूल शेती व मूल्य साखळीच्या कामांमध्ये सहभागी असलेल्या समुदाय-आधारित संस्था (CBOs) यांचा समावेश आहे.
- **प्रगतीशील शेतकरी:** ज्यांना नवीन तंत्रज्ञान, उद्योजकता आणि आधुनिक कृषी व्यवसायात रस आहे.
- **महिला स्वयं-सहायता गट.**
- **स्थानिक संस्था आणि यंत्रणा:** नियोजन, अंमलबजावणी आणि सेवा वितरणात गुंतलेल्या ग्रामपंचायती, ग्राम कृषी विकास समित्या यांसारख्या स्थानिक संस्था.

### ३.३ वंचित व्यक्ती आणि गट

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ मध्ये काही विशिष्ट **वंचित व्यक्ती आणि गट** ओळखले आहेत. या गटांना प्रकल्पाचे लाभ मिळवताना आणि हवामान-अनुकूल शेती पद्धती स्वीकारताना अधिक आव्हानांना किंवा अडथळ्यांना सामोरे जावे लागू शकते.

**लहान आणि सीमांत शेतकरी**: लहान व सीमांत शेतकरी हे मर्यादित जमीन व संसाधनांमुळे हवामानातील बदलांना अधिक असुरक्षित असतात. शासनाच्या योजनांची अपुरी माहिती, तसेच कर्ज, विमा व तंत्रज्ञानाच्या मर्यादित उपलब्धतेमुळे त्यांना नवीन कृषी पद्धती स्वीकारणे किंवा अनुकुलता वाढवणे आव्हानात्मक ठरते.

**भूमिहीन कुटुंबे आणि शेतमजूर**: भूमिहीन कुटुंबे त्यांच्या उपजीविकेसाठी मजुरी आणि सरकारी रोजगार योजनांवर (मनरेगासारख्या) अवलंबून असतात. जमिनीची मालकी नसल्यामुळे आणि पर्यायी रोजगाराच्या संधी कमी असल्यामुळे ते अत्यंत असुरक्षित असतात आणि ऑफ-सिझनमध्ये ते वारंवार शहरी किंवा निम-शहरी भागांमध्ये स्थलांतर करतात. गावातील अनौपचारिक भाडेकरू शेतकरी देखील वगळले जाण्याचा धोका आहे. सूक्ष्म-स्तरीय नियोजन आणि कृषी-संलग्न कामांसाठी (उदा. शेळीपालन, कुक्कुटपालन) आणि कौशल्य विकासासाठी सहाय्य करून त्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रकल्पाचा उद्देश आहे.

**महिला शेतकरी**: शेतीत सक्रिय असलेल्या महिला शेतकऱ्यांना अनेकदा माहिती, संसाधने आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यास अडचणी येतात. यामुळे हवामान-अनुकूल शेती पद्धती स्वीकारण्याची आणि प्रकल्पाच्या लाभांचा पूर्ण उपयोग करण्याची त्यांची क्षमता मर्यादित होते. सदर प्रकल्प महिलांचा सहभाग वाढवण्यावर आणि त्यांच्या मार्गातील लिंग-आधारित अडथळे दूर करण्यावर विशेष लक्ष केंद्रित करेल.

**अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागास वर्ग (OBCs)**: अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) आणि इतर मागास वर्ग (OBCs) हे समाजघटक सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या काही अडचणींना सामोरे जातात. यामुळे त्यांचा प्रकल्पातील सहभाग आणि प्रकल्पाचे लाभ मिळवण्याची त्यांची क्षमता मर्यादित होऊ शकते. महाराष्ट्र शासनाने या गटांच्या विकासासाठी नेहमीच पाठिंबा दिला असला तरी, हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी या समुदायांना लक्षित प्रकल्प धोरणे आणि योजनांची विशेष आवश्यकता आहे.

**आदिवासी समुदाय**: आदिवासी समुदाय: पेसा (Panchayats Extension to Scheduled Areas) आणि PVTG (Particularly Vulnerable Tribal Groups) क्षेत्रातील आदिवासी समुदायांना जमीन हक्क, संसाधन व्यवस्थापन आणि सांस्कृतिक जतन यासंबंधी अद्वितीय आव्हाने आहेत. पेसा कायदा या भागातील ग्रामसभांना अधिकार देत असला तरी, प्रकल्प हस्तक्षेप त्यांच्या पारंपरिक पद्धतींबद्दल संवेदनशील असणे आवश्यक आहे, सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आणि समुदाय आणि वन संसाधनांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.

**इतर असुरक्षित गट**: दिव्यांग व्यक्ती, महिला-प्रधान कुटुंबे, एकल महिला/विधवा, स्थलांतरित कामगार, महिला कामगार आणि भूमिहीन कृषी कामगार/कसेलदार यांचा समावेश असुरक्षित गटांमध्ये होतो.
नानाजी कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ वंचित आणि असुरक्षित गटांना लक्ष्यित पोहोच, क्षमता विकास आणि उपजीविका सहाय्याद्वारे प्रकल्पात समाविष्ट करेल. यात सूक्ष्म-स्तरीय नियोजनाद्वारे भाडेकरू शेतकरी व भूमिहीन मजुरांच्या गरजांवर लक्ष केंद्रित केले जाईल. तसेच, कौशल्य प्रशिक्षण व कृषी-संलग्न कामांसारख्या हस्तक्षेपांना सर्वात असुरक्षित घटकांना प्राधान्य दिले जाईल. याव्यतिरिक्त, आदिवासी आणि वन-आधारित समुदायांचा नियोजनात सहभाग वाढवून त्यांच्या हक्कांचे व संसाधनांचे रक्षण केले जाईल.

### ३.४ इतर संबंधित भागधारक (Other Interested Parties):

प्रकल्पाचा थेट परिणाम होणाऱ्या घटकांव्यतिरिक्त, टप्पा-२ मध्ये इतर अनेक संबंधित भागधारक (interested parties) समाविष्ट आहेत. यांची भूमिका, कौशल्ये आणि संस्थात्मक उद्दिष्टे प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणी आणि शाश्वततेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. यामध्ये कृषी धोरणकर्ते, कृषी विभाग आणि संलग्न क्षेत्रांतील अधिकारी, कृषी विज्ञान केंद्रांमधील (KVKs) आणि राज्य कृषी विद्यापीठांमधील (SAUs) शास्त्रज्ञ, तसेच कृषी विकासामध्ये कार्यरत असलेल्या प्रमुख संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. ग्रामीण भागातील वित्तपुरवठा, क्षमता विकास आणि समुदाय संघटन यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सामुदायिक संस्था (CBOs), स्वयं-सहायता गट (SHGs), तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँका, पतसंस्था आणि नाबार्ड (NABARD) यांसारख्या वित्तीय संस्था हे देखील प्रमुख भागधारक आहेत.

प्रकल्पाचे कार्यक्षेत्र जिल्हा आणि उपविभागीय स्तरावरील कार्यालये (DPIU आणि SPIU), ग्रामपंचायती, सरपंच, गटविकास अधिकारी, आणि इतर निवडून आलेले प्रतिनिधी यांच्यापर्यंत विस्तारलेले आहे. याशिवाय, शेतकरी महासंघ, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPOs), शेतकरी उत्पादक गट (FPCs), स्वयं-सहायता गट (SHGs), आणि शेतकरी स्वारस्य गट यांसारख्या विविध लाभार्थी गटांचाही यात समावेश आहे. प्रकल्पाच्या

कामांमुळे या संस्था आणि गटांना सकारात्मक तसेच काहीवेळा नकारात्मक परिणामांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे, प्रकल्पाची अंमलबजावणी समानतेने, पारदर्शकपणे आणि परिणामकारकरीत्या होण्यासाठी त्यांचा सक्रिय सहभाग आणि त्यांच्याकडून प्राप्त होणारा अभिप्राय (फीडबॅक) अनिवार्य आहे.

प्रकल्प टप्पा २ मध्ये प्रकल्पामार्फत शाश्वत शेतीवर काम करणाऱ्या स्थानिक/समुदाय-आधारित संस्थांशी, तसेच भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) संस्थांशी, संशोधन संस्थांशी आणि तांत्रिक सहकार्य देणाऱ्या कन्सोर्टिया भागीदारांशी समन्वय साधला जाईल. कृषी महाविद्यालये, कृषी विज्ञान केंद्रे (KVKs), आणि कृषी विस्तार व्यवस्थापनातील राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावरील संस्था यांसारख्या शैक्षणिक संस्थांचा समावेश त्यांच्या संशोधन, प्रशिक्षण आणि ज्ञान प्रसारणातील भूमिकेसाठी करण्यात आला आहे. कृषी विभाग आणि संलग्न क्षेत्रात कार्यरत अधिकारी व कर्मचारी, तसेच मनुष्यबळ पुरवठादार संस्थांकडून (HR agencies) नियुक्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रकल्पाच्या कार्यान्वयनातील आणि क्षेत्रीय पातळीवरील जबाबदाऱ्या विचारात घेतल्या जातील.

या व्यापक संबंधित घटकांशी (भागधारकांशी) संलग्न राहून, प्रकल्पाचे उद्दिष्ट बहुस्तरीय सहकार्य वाढवणे, तांत्रिक आणि संस्थात्मक क्षमतांचा योग्य वापर करणे, तसेच सर्व संबंधित घटकांचे दृष्टिकोन प्रकल्प आराखडा, संनियंत्रण आणि अनुकूली व्यवस्थापनामध्ये समाविष्ट केले जातील याची निश्चिती करणे हा आहे.

## ४. सहभागी भागधारकांशी केलेल्या सल्लामसलतीचा सारांश

प्रकल्पातील भागधारक ओळख आणि त्यांच्या विशिष्ट गरजा निश्चित करण्यासाठी केलेल्या क्षमता बांधणी गरजा विश्लेषण अहवाल (Capacity Enhancement Needs Assessment - CENA) यावर भागधारक सहभाग आराखडा (Stakeholder Engagement Plan - SEP) आधारित आहे. CENA ने शेतकरी, महिला, अनुसूचित जाती, जमाती, शेतमजूर, भूमिहीन व्यक्ती याचेसह असुरक्षित गट व युवा उद्योजक यांसारख्या महत्त्वाच्या घटकांसह प्रकल्प भागधारकांसाठी विविध प्रकारच्या प्रशिक्षणांची शिफारस केलेली आहे.

प्रकल्प पूर्वतयारीवेळेस माहे नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२४ या महिन्यांत प्रकल्पातील पाच जिल्ह्यामधील गडचिरोली, यवतमाळ, धाराशिव, जालना आणि नाशिकमधील १२ तालुक्यांतील २१ गावांमध्ये वंचित आणि इतर इच्छुक भागधारक गटांच्या सहभागातून भागधारक सल्लागार बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. याद्वारे विविध भागधारक गटांतील सुमारे ७०० प्रतिनिधींनी भाग घेतला, ज्यात आदिवासीबहुल जिल्हे गडचिरोली, यवतमाळ आणि नाशिकमधील प्रतिनिधींचा समावेश होता. सदर भागधारकांच्या सल्लामसलतीमुळे स्थानिक भागातील प्रचलित समस्या आणि संधींची, विशेषतः हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, सर्वंकष माहिती मिळाली.

**सल्लामसलतींमध्ये समाविष्ट केलेले प्रमुख विषय पुढील प्रमाणे होते:**

प्रकल्पाची उद्दिष्ट्ये, हस्तक्षेप आणि लक्ष्यित लाभार्थी, संभाव्य पर्यावरणीय आणि सामाजिक धोके आणि परिणाम, भागधारकांची भूमिका, शेती आणि हवामानातील बदलांशी संबंधित आव्हाने, वंचित आणि असुरक्षित गटांचा समावेश, अनुसूचित जमाती आणि पेसा क्षेत्र, महिलांचा सहभाग आणि सुरक्षा, तक्रार निवारण आणि

एकात्मिक पिक व्यवस्थापन (Integrated Plant Nutrient Management - IPNM) यासंबंधी अभिप्राय, सूचना आणि जोखीम व्यक्त करण्यासाठी सहभागींना प्रोत्साहित करण्यात आले. या दरम्यान प्रकल्पाबद्दल माहिती दिल्यानंतर सहभागींनी आपला अभिप्राय नोंदवला. सल्लामसलत दरम्यान मिळालेला अभिप्राय प्रकल्पाच्या आराखड्यात समाविष्ट करण्यासाठी विचारात घेण्यात असून प्राप्त झालेल्या आणि SEP मध्ये समाविष्ट केलेल्या मुख्य शिफारशींचा सारांश परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आला आहे.

**भागधारकांकडून प्राप्त अभिप्राय:**

**हवामान बदलाचे परिणाम**: अनियमित पाऊस, दीर्घकाळ कोरडे हवामान, बिगर मोसमी पाऊस आणि गारपीट, ज्यामुळे पीक उत्पादनात घट झाली आणि आर्थिक ताण वाढला विषयी शेतकऱ्यांनी माहिती दिली.

**कीड व्यवस्थापन**: रासायनिक कीटकनाशकांवर जास्त अवलंबित्व दिसून आले, ज्यात उच्च निविष्ठा खर्च आणि जैविक पद्धतींचा किमान (Minimal) वापर होता. शेतकऱ्यांनी सुरक्षित कीटकनाशक वापर, जैविक पर्याय आणि योग्य विल्हेवाट पद्धतींवर प्रशिक्षणाची गरज व्यक्त केली.

**ऊर्जा आणि सिंचन**: वारंवार वीजपुरवठा खंडित होणे आणि डिझेलचा उच्च खर्च ही प्रमुख चिंता होती. अनुदानित सौर पंप आणि सुधारित सिंचन पायाभूत सुविधांची जोरदार मागणी होती.

**वन्यजीव संघर्ष**: वन्य प्राण्यांमुळे (डुक्कर, हरीण, हत्ती) पिकांचे नुकसान ही एक व्यापक समस्या होती. शेतकऱ्यांनी शेतांचे संरक्षण करण्यासाठी तारेचे किंवा सौर कुंपण उभारण्यासाठी मदतीची विनंती केली.

**महिलांचा सहभाग**: महिला स्वयं-सहायता गटांनी कृषी-संलग्न कामांसाठी, कौशल्य विकासासाठी आणि उत्पन्न मिळवून देणाऱ्या उद्योगांसाठी आर्थिक सहाय्य वाढवण्याची विनंती केली.

**उपजीविका विविधीकरण**: भूमिहीन आणि सीमांत शेतकऱ्यांनी शेळीपालन, कुक्कुटपालन आणि संलग्न कामांसाठी तसेच गैर-शेती उत्पन्न वाढवण्यासाठी कौशल्य प्रशिक्षणासाठी मदतीची मागणी केली.

**पीक अवशेष आणि सेंद्रिय पद्धती**: कंपोस्ट खत बनवण्याची साधने आणि ज्ञानाच्या अभावामुळे बहुतेक शेतकरी पीक अवशेष जाळतात. अवशेष व्यवस्थापन, सेंद्रिय निविष्ठा आणि विघटनशील रसायनांसाठी मदतीची मागणी होती.

**पायाभूत सुविधा आणि उपकरणे**: ट्रॅक्टर, स्प्रेअर, साठवण सुविधा आणि वाहतूक वाहनांसाठी उत्पादकता आणि बाजारपेठेत प्रवेश सुधारण्यासाठी अनुदानाची मागणी करण्यात आली.

**प्रकल्पाकडून अपेक्षा**: भागधारकांनी हवामान-अनुकूल बियाणे, मृद व जल संधारण, वित्त व्यवस्थापन, संरक्षित पिक पद्धती आणि मजबूत विस्तार सेवांची गरज यावर जोर दिला.

**वंचित गटांसाठी** (महिला, अनुसूचित जाती/जमाती, आदिवासी आणि भूमिहीन कुटुंबे) न्याय आणि पारदर्शक लाभ वितरणाची मागणी देखील करण्यात आली.

**तक्रार निवारण**: सहज सोपी तक्रार निवारण यंत्रणा आणि प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान लाभार्थी सोबत नियमित सवांद आणि पारदर्शकता यावर भर दिलेला आहे.

प्रकल्पातील लाभार्थ्यांसाठी हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी प्रोत्साहन देण्याबरोबरच भागधारकांचा अभिप्राय प्रकल्प आराखड्यात समाविष्ट करण्यात आलेला असून सर्वसमावेशक लाभ-वाटप, क्षमता बांधणी, पायाभूत सुविधा सहाय्य आणि महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायांच्या विविध गरजा पूर्ण करताना येणाऱ्या अडचणीचे निवारण करण्याकरिता सुलभ तक्रार निवारण प्रणाली यावर लक्ष केंद्रित केले आहे.

## ५. भागधारक सहभागिता कार्यक्रम

### ५.१ भागधारकांच्या गरजा आणि सहभागाच्या पद्धतींचा सारांश

विविध भागधारकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध सहभागिता पद्धती प्रस्तावित आहेत:

- **गावस्तरीय हवामान अनुकूल आराखडा तयार करण्यासाठी लोकसहभागी नियोजन**
- **सामुदायिक सल्लामसलत**
- **लक्ष गट चर्चा** (Focus Group Discussions - FGDs)
- **स्थळ भेटी**
- **कार्यशाळा आणि प्रशिक्षण** आणि
- **स्वयंसेवी संस्था (CBO)/ अशासकीय संस्था (NGO)** आणि इतर प्रतिनिधींसोबत औपचारिक बैठका

आवश्यकतेनुसार, विविध हितधारकांशी सहभागाच्या अतिरिक्त पद्धती जोडल्या जाऊ शकतात.

### ५.२ भागधारक सहभागिता उपक्रमांचे वेळापत्रक:

भागधारकांच्या गरजा आणि त्यांच्याशी संवाद साधण्याच्या पद्धती पुढील तक्त्यात दर्शविल्या आहेत:

**तक्ता १: टप्प्यानुसार भागधारकांशी संलग्नता आणि जबाबदार विभाग.**

| प्रकल्प टप्पा | अपेक्षित तारीख/वेळ | सल्लामसलतीचा विषय/संदेश | वापरलेली पद्धत | लक्ष्यित भागधारक | जबाबदाऱ्या |
|---|---|---|---|---|---|
| **तयारीचा टप्पा** | पहिले वर्ष (अंमलबजावणी टप्प्यापूर्वी) | • प्रकल्प आराखडा, व्याप्ती, दृष्टिकोन, लाभ, वेळापत्रक, प्रगती.<br>• उपक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली | • प्रत्यक्ष भेटी<br>• ऑनलाइन बैठका/ वेबिनार<br>• अधिकृत पत्र कार्यशाळा आणि प्रशिक्षण बाबत | • प्रकल्पातील प्राथमिक भागधारक<br>• प्रकल्पाचे जिल्हा व उपविभागाचे अधिकारी व | पीएमयू/ डीपीआययू/ एसपीआययू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोणतीही पूर्व परवानगी<br>• तक्रार निवारण प्रक्रिया | | कर्मचारी,ग्रामपंचायत / ग्राकृविसमिती सदस्य व क्षेत्रीय अधिकारी | |
| **अंमलबजावणी टप्पा** | प्रकल्प अंमलबजावणीचा नियोजित कालावधी | • प्रकल्प अंमलबजावणी प्रगतीचा पाठपुरावा, मध्यवर्ती आढावा, धोरणांचे अनुकूलन, प्रगती सनियंत्रण, तक्रार निवारण आणि अभिप्राय संकलन<br>• प्रकल्प अंमलबजावणी चे कालावधी निहाय नियोजन, पूर्व माहिती<br>• दुर्बळ गट, महिला प्रधान कुटुंबे (WHHs), दिव्यांग व्यक्ती (PwD), भूमिहीन, अनुसूचित जाती/जमाती इ.साठी केलेल्या तरतुदी<br>• दुर्बळ आणि वंचित गटांसाठी विशिष्ट अभिकल्प हस्तक्षेप<br>• लैंगिक छळ/ शोषण आणि त्याचे प्रबंधक | • क्षेत्रभेटी, समुदाय बैठका, भागधारक कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रे, डिजिटल प्रणाली व नियमित अहवाल<br>• मार्ग फलक (Signboards)<br>• फ्लेक्स फलक (बॅनर)<br>• सार्वजनिक ठिकाणे आणि समुदाय केंद्र सूचना फलक<br>• स्वयं-सहायता गट बैठका<br>• स्थानिक अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींबरोबर बैठका | शेतकरी, शेतकरी उत्पादक संस्था (FPOs), स्वयं-सहायता गट (SHGs), ग्रामपंचायती, अधिकारी आणि कर्मचारी तसेच प्रकल्पात कार्यरत विस्तार कार्यकर्ते. | पीएमयू/ डीपीआययू/ एसपीआययू, क्षेत्रीय कार्यान्वयन युनिट्स (जीकेव्हीएस), वित्तीय आणि ज्ञान भागीदार संस्था |
| **प्रकल्प अंतिम** | शेवटच्या | प्रकल्प समाप्ती, | अंतिम भागधारक | शेतकरी, | पीएमयू/ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **टप्पा** (withdrawal phase ) | वर्षातील टप्पा | परिणामांचे मूल्यमापन, ज्ञान प्रसार, शाश्वतता योजना, संक्रमण धोरण, तक्रार निवारण अंतिम करणे | सल्लामसलत, प्रसार कार्यशाळा, छापील अहवाल,मल्टीमीडिया सादरीकरणे आणि डिजिटल प्लॅटफॉर्म. | स्थानिक स्वराज्य संस्था, समुदाय आधारित संस्था, धोरणकर्ते | डीपीआययू/ एसपीआययू , |

**५.३ माहिती प्रसारण करण्याचे धोरण** (Strategy for Information disclosure)

प्रकल्पाच्या भागधारक सहभागिता आराखड्याचा (Stakeholder Engagement Plan - SEP) आणि पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी आराखड्याचा (Environmental and Social Commitment Plan - ESCP) मसुदा आणि अंतिम आवृत्ती नादेकृसं प्रकल्प- टप्पा-२ च्या वेबसाइटवर आणि त्यानंतर, जागतिक बँकेच्या बाह्य साइटवर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच कामगार व्यवस्थापन प्रक्रिया (Labor Management Procedures - LMP) आणि भागधारक सहभागिता योजना (SEP) सह पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखड्याच्या (Environmental and Social Management Framework - ESMF) मसुद्यावर चर्चा करण्यासाठी आणि अभिप्राय मिळवण्यासाठी भागधारक सल्लामसलत कार्यशाळा आयोजित केली जाईल. त्यानंतर, SEP आणि ESMF अंतिम केले जातील आणि नादेकृसं प्रकल्प- टप्पा-२ आणि जागतिक बँकेच्या वेबसाइटवर पुन्हा प्रसिद्ध केले जातील.

प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणीचे निवारण तक्रार निवारण यंत्रणा (Grievance Redressal Mechanism - GRM) प्रक्रिया; प्रकल्प अभिमुखता बैठका; प्रकल्प अंमलबजावणी विषयी नियमित लक्ष्याक पुर्तता, सार्वजनिक सूचना, जाहिरात व प्रसिद्धी, प्रकल्प वेबसाइट, सल्लामसलत बैठका, माहिती पत्रके आणि पुस्तिका, असुरक्षित गटांसोबत स्वतंत्र केंद्रित गट बैठका, वृत्तपत्रके, अभ्यास दौरे व बैठका इत्यादी माहिती स्थानिक भाषेत प्रसिद्ध केली जाईल. ही माहिती प्रकल्प भागधारकांशी समोरासमोर बैठका, छापील प्रतींचे वितरण, पोस्टर्स, पत्रके आणि पुस्तिका आणि नादेकृसं प्रकल्प- टप्पा-२ वेबसाइट आणि स्थानिक भाषेतील स्थानिक माध्यमांद्वारे शक्य असलेल्या सर्व माध्यमांद्वारे प्रसिद्ध केली जाईल, जेणेकरून दुर्गम भागात राहणाऱ्यांसह प्रकल्पाच्या सर्व लाभार्थ्यांपर्यंत कागदपत्रे पोहोचू शकतील.

**तक्ता २: : माहिती प्रसारण करण्याचे प्रस्तावित धोरण**

| माहिती प्रसिद्ध करण्याचा तपशील | प्रस्तावित पद्धती | वेळ | लक्ष्यित भागधारक |
|---|---|---|---|
| प्रकल्पाची माहिती (उद्दिष्ट्ये, घटक, फायदे, अंमलबजावणी व्यवस्था) | प्रकल्प वेबसाइट, गाव बैठका, समाज मीडिया, मोबाइल ॲप्स, सामुदायिक रेडिओ | अंमलबजावणीपूर्वी आणि संपूर्ण प्रकल्पभर | सर्व भागधारक |
| पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (Environmental and Social Management Framework – ESMF) | प्रकल्प वेबसाइट, मोबाइल ॲप्लिकेशन्स, सार्वजनिक सल्लामसलत येथे सादरीकरणे | प्रकल्प कार्यरत झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत | सर्व भागधारक, विशेषत: बाधित समुदाय |
| प्रकल्प लाभांसाठी पात्रता निकष | माहितीपत्रके, गाव बैठका, FPO/FPC बैठका, मोबाइल SMS अलर्ट, DBT पोर्टल | अंमलबजावणीपूर्वी आणि वार्षिक नियोजन चक्र दरम्यान | संभाव्य लाभार्थी, विशेषत: लहान आणि अल्पभूधारक शेतकरी, वंचित घटक |
| गाव अनुकूलन आराखडा (Village Adaptation Plans) | गाव बैठका, ग्रामपंचायत कार्यालयात प्रदर्शन, डिजिटल प्लॅटफॉर्म | प्रत्येक गाव योजना पूर्ण झाल्यावर | गाव समुदाय, स्थानिक सरकारी अधिकारी |
| हवामान-अनुकूल पद्धतींवरील तांत्रिक माहिती | मोबाइल ॲप्स, प्रात्यक्षिक स्थळे, शेतकरी क्षेत्र शाळा (Farmer Field Schools), प्रशिक्षण साहित्य, व्हिडिओ | कृषी हंगामाशी जुळवून अंमलबजावणीद्वारे | शेतकरी, कृषी विस्तार कार्यकर्ते, FPO/FPC |
| प्रकल्प प्रगती अहवाल | प्रकल्प वेबसाइट, जिल्हा-स्तरीय बैठका, भागधारक कार्यशाळा | त्रैमासिक आणि वार्षिक | शासन अधिकारी, नागरी समाज, आंतरराष्ट्रीय संस्था |
| तक्रार निवारण यंत्रणा (Grievance mechanism) | गाव बैठका, मोबाइल अलर्ट, प्रकल्प वेबसाइट, प्रकल्प ॲप्स | अंमलबजावणीपूर्वी आणि नियमित स्मरणपत्रे | सर्व भागधारक, विशेषत: बाधित समुदाय |
| सनियंत्रण आणि मूल्यांकन निष्कर्ष (Monitoring and evaluation findings) | भागधारक कार्यशाळा, वेबसाइट, सोशल मीडिया, सामुदायिक बैठका | मध्यवर्ती आणि प्रकल्प पूर्ण झाल्यावर | सर्व भागधारक |

## ५.४ वंचित आणि असुरक्षित गटांसाठी धोरण

नादेकृसं प्रकल्प- टप्पा-२ च्या सर्व पैलूंमध्ये असुरक्षित गटांचा अर्थपूर्ण सहभाग सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्प लक्ष्यित धोरणे लागू करेल. लिंग समावेशकता व सर्वसमावेशक प्रकल्प अमलबजावणी धोरणा अंतर्गत महिला शेतकऱ्यांचा सहभाग वाढविणे, सल्लामसलत (consultations), त्यांच्या सुयोग्य वेळी आणि ठिकाणी आयोजित केल्या जातील, महिलांसाठी आरामदायक वातावरण तयार करण्यासाठी महिला सुविधाकार (facilitators) प्रदान करणे, विशेष ग्रामसभा, चर्चासत्रे मार्फत संवाद साधने आणि कृषी ताई (महिला संचेतक) यांचा उपयोग यासाठी करण्याचे नियोजन केलेले आहे. प्रकल्पातील ग्राम कृषी विकास समितीमध्ये (GKVS) महिलांसाठी ५०% प्रतिनिधित्व ठेवलेले असून महिलांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी हस्तक्षेपांची रचना केलेली आहे. तसेच ergonomically (श्रमदक्षताशास्त्र) पद्धतीने तयार केलेली शेती उपकरणे प्रदान करणे आणि महिला शेतकऱ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवण्यासाठी डिजिटल शेतकरी क्षेत्र शाळा आयोजित केल्या जातील. याव्यतिरिक्त, प्रकल्प केवळ महिलांसाठी असलेले स्वयं-सहायता गट (SHG) आणि महिलांच्या नेतृत्वाखालील शेतकरी उत्पादक संघटनांना (FPO) प्रोत्साहन देईल.

आदिवासी समुदायांसाठी, प्रकल्प स्थानिक भाषा आणि चालीरीतींशी परिचित असलेल्या स्थानिक आदिवासी सुविधाकारांना (facilitators) सहभागी करेल, सल्लामसलत सांस्कृतिकदृष्ट्या योग्य प्रकारे आणि स्थानिक भाषांमध्ये आयोजित केली जाईल याची खात्री करेल. बैठका पारंपरिक उपक्रम आणि हंगामी स्थलांतर पद्धतींचा आदर करण्यासाठी आयोजित केल्या जातील आणि आदिवासी विकास संस्था आणि तज्ज्ञांशी भागीदारी केली जाईल. कमी साक्षरता असलेल्या समुदायांपर्यंत पोहोचण्यासाठी, चित्रमय माहिती विकसित केले जाईल आणि पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थापन आराखड्यात (Environmental and Social Management Framework - ESMF) नमूद केलेले आदिवासी समुदाय विकास नियोजन आराखडा (Indigenous Peoples Planning Framework - IPPF) लागू केले जाईल.

प्रकल्पांतर्गत भूमिहीन आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांनच्या सहभागासाठी त्यांना गाव-पातळीवरील सल्लामसलतांमध्ये प्रतिनिधित्व दिले जाईल. तसेच भूमिहीन आणि अपंग घटकांच्या सहभागासाठी विशेष प्रकारे नियोजन करून त्यांचेपर्यंत आर्थिक सक्षमता निर्माण होईल अशा प्रकारच्या कृषी क्षेत्रातील संधी निर्माण करून देण्यात येतील व उपजीविका निर्माण करण्यात येतील.

डाव्या विचारसरणीच्या प्राबल्य असलेल्या आणि नक्षली दृष्ट्या ओळखल्या जाणाऱ्या भागामध्ये (Left Wing Extremism - LWE) दुर्गम समुहा करिता स्थानिक मध्यस्थांद्वारे (intermediaries) छोट्या बैठका मार्फत वारंवार बैठका आयोजित करून सुरक्षा जोखीम चे निराकरण करण्यात येईल व त्यांचा सहभाग वाढवण्यावर भर देण्यात येईल. तसेच प्रकल्पाच्या पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन नियोजन (ESM) मध्ये नमूद केल्यानुसार योग्य LWE धोके कमी करणारे उपाय देखील लागू करेल.

### ५.५ भागधारकांना अहवाल देणे

प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान भागधारकांना तक्रार निवारण यंत्रणा, भागधारक सहभाग वाढविणे, प्रकल्प प्रगती व प्रकल्पाच्या पर्यावरणीय सामाजिक कामगिरीचा नियमित अहवाल व माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

## ६. भागधारक सहभाग आराखडा (SEP) अंमलबजावणीसाठी संसाधने आणि जबाबदाऱ्या

### ६.१ संसाधने

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU), जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPIU), उपविभागीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (SPIU) आणि क्षेत्रीय कार्यालयांच्या मदतीने भागधारक सहभाग उपक्रमांची जबाबदारी घेईल. भागधारक सहभाग आराखडा (SEP) साठी प्रस्तावित अंदाजित बजेट खालीलप्रमाणे पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखड्यासाठी (Environment and Social Management Framework - ESMF) (ESMF) एकूण बजेटमध्ये समाविष्ट आहे.

**तक्ता ३: पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) अंमलबजावणीसाठी संभाव्य आर्थिक बाबींचा तपशील:**

| अ क्र. | प्रकल्प घटकांचा तपशील | संख्या | रक्कम (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| १ | मनुष्यबळ | | |
| | PMU मध्ये पर्यावरण विशेषज्ञ (१) | १ | १.६२ |
| | PMU मध्ये सामाजिक विकास विशेषज्ञ (१) | १ | १.६२ |
| | तांत्रिक सहाय्यक- पर्यावरण (१) | १ | ०.३६ |
| | तांत्रिक सहाय्यक- सामाजिक विकास (१) | १ | ०.३६ |
| | प्रकल्प विशेषज्ञ, मनुष्यबळ (DPIU मध्ये) | २१ | ७.५६ |
| | प्रकल्प विशेषज्ञ कृषी व्यवसाय | २१ | ७.५६ |
| | तंत्रज्ञान समन्वयक | ५५ | १५.८४ |
| | समूह सहाय्यक | ८२५ | १४८.५० |
| | अल्पकालीन सल्लागार, संसाधन व्यक्ती (SEP, ESMF, IPNM व प्रशिक्षण) पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF), आदिवासी विकास आराखडासह प्रभावी अंमलबजावणी | | ०.१० |
| २ | पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) | | |

| अ क्र. | प्रकल्प घटकांचा तपशील | संख्या | रक्कम (रु. कोटी) |
|---|---|---|---|
| | ESMF अभ्यास, ज्ञान सामायिकरण (विषय अभ्यास, शिक्षण कार्यक्रम, अभ्यास दौरे) | | ०.१० |
| | आदिवासी विकास आणि अंमलबजावणी सहाय्यता व सल्लासेवा | | ०.१० |
| | उप-प्रकल्पांसाठी बजेट | | |
| | SEP अल्प-मुदतीचे सल्लागार | | ०.१० |
| | प्रकल्प वेबसाइट | | |
| | भागधारक सहभाग कार्यक्रम (IEC साहित्य, कार्यक्रम, मोहीम इ.) | | |
| | तक्रार निवारण यंत्रणा | | ०.१५ |
| | पर्यावरणीय सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMF) विषयक क्षमता बांधणी | | |
| | प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी (DPIU, GKVS, FPO, समुदाय) | | ३.०० |
| | ESMF, SEP, GRM, IPPF, याविषयी वेबसाइट करिता IEC तयार करणे तसेच साहित्य / प्रकाशने व जाहिरात प्रसिद्धी करणे | | ०.१० |
| | हरित तंत्रज्ञान, हरित मूल्य साखळ्या (greening value chains) यासह नवीन आणि पायलट हस्तक्षेप | | ०.५० |
| | विविध खर्च, ओव्हरहेड्स | | ०.२० |

### ६. २ प्रकल्प अंमलबजावणी व्यवस्थापन यंत्रणेचे कार्ये आणि जबाबदाऱ्या

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चे प्रभावी अंमलबजावणी करिता निर्माण करण्यात आलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, उपविभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, आणि क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी हे जबाबदार असतील. यामध्ये भागधारकाच्या सर्वसमावेशक सहभाग नियोजन, तक्रार निवारण आणि समूह सहभाग मोहिम (community engagement operations) इत्यादींचा समावेश आहे.

**तक्ता ४: भागधारक सहभाग आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी भूमिका आणि जबाबदाऱ्या**

| स्तर | एजन्सी/व्यक्ती | भूमिका आणि जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| GP/ GKVS | * कृषी सहाय्यक/समूह सहाय्यक, कृषी ताई यांच्या मदतीने<br>* तालुका कृषी अधिकारी (TAO) आणि मंडळ कृषी अधिकारी (CAO) - तयारी दरम्यान SEP तयार करताना/ SEP सल्लामसलत सत्रांसाठी. | * सामुदायिक सल्लामसलतांद्वारे (community consultations) प्रकल्पाच्या तयारी/अंमलबजावणीच्या विविध टप्प्यांमध्ये समुदायाला एकत्रित करणे आणि त्यांच्याशी सल्लामसलत करणे.<br>* समुदायाचा सहभाग असलेल्या गावांमध्ये समुदायांचे मत/सूचना घेण्यासाठी सल्लामसलत करणे<br>* सल्लामसलतीचा निष्कर्ष नोंदवणे.<br>* सल्लामसलतीचा निकाल प्रकल्प तयारी टीमसोबत सामायिक करणे.<br>* प्रकल्प अंमलबजावणी आणि तक्रारींवर समुदायाकडून अभिप्राय घेणे. |
| उपविभागीय स्तर | उपविभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (SPIU) | * उपविभागीय कृषी अधिकारी हे उपविभागीय स्तरावर SEP च्या अंमलबजावणीमध्ये समुदायांना, प्रकल्प क्षेत्रातील लाभार्थ्यांना मदत करण्यासाठी नोडल अधिकारी असतील.<br>* डिझाइनमध्ये समुदायाच्या अभिप्रायाचा योग्य समावेश करण्यासाठी अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींशी संपर्क करणे.<br>* माहिती प्रसारासाठी आणि सहकार्यासाठी तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे.<br>* योजनांच्या अंमलबजावणीच्या सामग्री (content) आणि प्रक्रियेबद्दल समुदायाला समजावून सांगणे.<br>* वाढीव तक्रारी आणि त्याच्या निराकरणासाठी संरक्षणासंबंधित (safeguard) प्रथम स्तरावरील संपर्क. |
| जिल्हा स्तर | जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (DPIU) | * DSAO, PD ATMA यांच्या समन्वयाने SEP च्या अंमलबजावणीमध्ये समुदायांना, प्रकल्प क्षेत्रातील लाभार्थ्यांना मदत करतील.<br>* माहिती प्रसारासाठी आणि सहकार्यासाठी संबंधित लाइन विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे.<br>* बैठकीचे इतिवृत्त (minutes) तयार करणे आणि ते प्रसारित करणे.<br>* जिल्हा स्तरावर वाढीव तक्रारींचे निराकरण. |
| विभाग स्तर | विभागीय कृषी सहसंचालक | * नोडल अधिकाऱ्याच्या मदतीने विभागीय कृषी सहसंचालक (JDA) SEP च्या अंमलबजावणीमध्ये समुदायांना, प्रकल्प क्षेत्रातील लाभार्थ्यांना मदत करतील.<br>* माहितीचा प्रसार आणि सहकार्यासाठी संबंधित विभागांच्या विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांशी संपर्क साधणे. |

| स्तर | एजन्सी/व्यक्ती | भूमिका आणि जबाबदाऱ्या |
|---|---|---|
| | | * बैठकीचे इतिवृत्त तयार करणे आणि ते प्रसारित करणे.<br>* विभाग स्तरावर वाढीव तक्रारींचे निराकरण. |
| राज्य स्तर | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) | * SEP प्रक्रियेसाठी मार्गदर्शन आणि सनियंत्रण पर्यवेक्षण प्रदान करणे.<br>* विविध भागधारक गटांना आवश्यक असलेली माहिती उघड करण्यासाठी योग्य माहिती, शिक्षण आणि संवाद (IEC) तसेच अन्य संपर्क साहित्य तयार करून उपलब्ध करून देणे.<br>* SEP संबंधित माहिती प्रकटीकरण आणि भागधारक सहभागाची वेळ आणि कालावधी निश्चित करणे.<br>* डीपीआययू (DPIU) / एसपीआययू (SPIU) कर्मचाऱ्यांना एसईपी (SEP) आणि त्याच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेल्या बाबींबद्दल मार्गदर्शन करणे.<br>* इतर संबंधित घटकांना (भागधारकांना) आवश्यक ती माहिती आणि 'माहिती, शिक्षण व संवाद' (IEC) सामग्री तयार करणे, तसेच ती त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार समायोजित करणे.<br>* प्रत्यक्ष भागधारक सल्लामसलत सर्व बैठकांमध्ये योग्य प्रतिनिधीमार्फत सहभागी होणे.<br>* भागधारक सहभाग कार्यक्रमांचे कागदपत्रे तपासणे व दस्तऐवजीकरण करणे; भागधारक डेटाबेस अद्ययावत ठेवणे.<br>* प्रकल्पाच्या संपूर्ण कालावधीत शासकीय संस्था आणि प्रसारमाध्यमांशी संवाद साधणे.<br>* असुरक्षित गटांमधील भागधारकांचा सहभाग/समावेश सुनिश्चित करणे. |
| राज्य स्तर | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) मधील सामाजिक विकास विशेषज्ञ | * भागधारक सहभाग आणि व्यवस्थापनाशी संबंधित सर्व उपक्रमांचे पर्यवेक्षण आणि समन्वय करणे.<br>* विकसित केलेली सर्व सामग्री/ धोरणे सांस्कृतिकदृष्ट्या योग्य आहेत आणि भागधारकांना सहज समजण्याजोग्या स्वरूपात उपलब्ध आहेत याची खात्री करणे.<br>* SEP संबंधित माहिती प्रकटीकरण आणि भागधारक सहभागाची वेळ आणि कालावधी निश्चित करणे.<br>* प्रकल्पासाठी विकसित केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेमध्ये प्रवेश आणि प्रभावीता सुनिश्चित करणे. |

| स्तर | एजन्सी/व्यक्ती | भूमिका आणि जबाबदाऱ्या |
| --- | --- | --- |
| | | * भागधारक सहभागाच्या आवश्यकता/ प्रोटोकॉल समजले आहेत याची खात्री करण्यासाठी DPIU, SPIU, PMU आणि इतर प्रकल्प कर्मचाऱ्यांशी संपर्क साधणे.<br>* विविध प्रकल्प अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे आणि त्यांना भागधारक सहभाग प्रक्रियेबद्दल माहिती दिली जाते याची खात्री करणे. |
| राज्य स्तर | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) मधील मधील पर्यावरण विशेषज्ञ | * पर्यावरणीय बाबींवर अतिरिक्त माहिती तयार करण्यास साहाय्य करणे, जी आवश्यकतेनुसार भागधारकांना उपलब्ध करून दिली जाईल.<br>* समुदाय कंत्राटदार (contractors), DPIU, SPIU, PMU आणि इतर प्रकल्प कर्मचाऱ्यांना SEP मध्ये सहभागी होण्यासाठी आणि संबंधित उपक्रमांचे समन्वय साधण्यासाठी मार्गदर्शन करण्यास मदत करणे. |

**६. ३ तक्रार निवारण यंत्रणा:**

जागतिक बँकेच्या प्रकल्प अंमलबजावणी धोरण मधील पर्यावरणीय आणि सामाजिक मानक क्र १० .नुसार डिजिटल तथा प्रत्यक्ष विविध माध्यमांद्वारे कार्यक्षम आणि सुलभ तक्रार निवारण यंत्रणा (GRM) तयार करण्यात आली असून सदर यंत्रणा अधिक सक्षम करण्याकरिता प्रकल्पा संदर्भातील सर्व तक्रारी वेळेत, पारदर्शकपणे हाताळून निराकरण करण्यावर भर देण्याचे धोरण निश्चीत करण्यात आलेले आहे. तसेच महिलांचे लैंगिक छळ आणि शोषण (SEA/SH) संबंधित तक्रारीं काळजीपूर्वक हाताळणे, कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळ व शोषणाच्या घटना मध्ये पिडीताना सुरक्षित, गोपनीय आणि केंद्रित पद्धतीने आवश्यक सेवा देणे आणि सेवा पुरवठादारासोबत मिळून अशा घटना घडण्यापासून थांबविण्यासाठी समिती मार्फत व्यवस्था निर्माण केलेली आहे.

प्रकल्पातील तक्रार निवारण यंत्रणेचा सविस्तर तपशील भागधारक सहभाग आराखड्यामध्ये (SEP) नमूद करण्यात आला असून कोणत्याही तक्रारींचे त्वरित निराकरण करून, भागधारकांमध्ये प्रकल्पाबद्दलची मालकी आणि जवळीक वाढवण्यास मदत करेल.

तसेच प्रादेशिकता विविधता, भौगोलिक अंतर, तांत्रिक अडथळे आणि जागरूकतेचा अभाव यामुळे आदिवासी बहुल समुदायांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण करिता विशेष भर देवून त्यांच्या हक्क, अधिकारी याविषयी त्यांचे ज्ञान वाढवून प्रकल्पामध्ये त्यांचा सहभाग वाढविणे आणि सुलभ तक्रार निवारण यंत्रणा धोरण तयार करण्याचे नियोजित आहे. सांस्कृतिक आणि भाषिक विविधता लक्षात घेऊन, गाव समुदायांसाठी अधिक सुलभ औपचारिक प्रणाली तयार करण्याची संधी प्रकल्पामार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेषतः असुरक्षित आदिवासी गट (PVTGs), महिला आणि अल्पभूधारक शेतकरी यांसह सर्व गटांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करणारे सर्वसमावेशक आराखडे तयार करण्यावर भर देण्यात आला आहे.

वरील बाबी विचारात घेऊन, पुढील प्रमाणे तक्रार निवारण यंत्रणा प्रस्तावित करण्यात येत आहे:

### ६.४ सध्याची तक्रार निवारण यंत्रणा

- **ग्राम पातळीवरील अनौपचारिक यंत्रणा**: ग्राम पातळीवर अनेक तक्रारी/अडचणी ग्राम समितीमध्ये विचारमंथन करून सोडवल्या जातात. तसेच, ग्रामपंचायती आणि ग्रामसभा या देखील सामुदायिक समस्या मांडण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतात.

- **शासकिय यंत्रणा:** यामध्ये महाराष्ट्र शासन संचलित 'आपले सरकार' (AAPLE SARKAR) सारख्या ऑनलाइन स्वतंत्र प्रणालीचा (पोर्टल) समावेश आहे, जिथे नागरिक राज्यातील सार्वजनिक सेवांबद्दल, प्रशासन आणि जिल्हा, उपविभाग, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावरील विविध शासकीय योजना आणि सेवांबद्दल तक्रारी दाखल करू शकतात. याशिवाय, शेतकरी गट, महिला बचत गट आणि सहकारी संस्थांचे सदस्य आणि सामान्य नागरिक यांचेकरिता 'केंद्रीकृत सार्वजनिक तक्रार निवारण आणि देखरेख प्रणाली' (CPGRAMS) ही ऑनलाइन प्रणाली शासकीय सेवा संदर्भात तक्रारी दाखल करण्यासाठी सात दिवसातले २४ तासामध्ये नियमित उपलब्ध असते.

- **तसेच शेतकरी गट/ कंपन्या, महिला बचत गट आणि सहकारी संस्था** ह्या कृषी निविष्ठा, विपणन किंवा पिक माल दरांशी संबंधित तक्रारी आणि सभासदां संदर्भात तक्रारी गटातील सदस्यांच्या बैठकीमध्ये सामूहिक चर्चेद्वारे हाताळतात ही पद्धती समूह गटांसाठी अनौपचारिक आधार यंत्रणा म्हणून काम करते.

प्रस्तुत तक्रार निवारण यंत्रणा मार्फत प्रकल्पातील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करते. प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण हे त्यांचे कराराच्या अटी, शर्ती आणि शासकीय नियमांनुसार सोडवल्या जातील.

प्रकल्प जिल्ह्यातील ग्राम समूहातील तक्रारी किंवा वाद हे ग्राम कृषी विकास समिती च्या समन्वयातून कृषी सहाय्यक, समूह सहाय्यक आणि कृषी ताई यांच्या मदतीने तक्रार निवारण करण्यात येईल. तसेच याठिकाणी तक्रार निवारण न झाल्यास ग्रामसभेकडे मार्फत तक्रारी सोडवण्यात येतील.

### ६. ५ तक्ता ३०: प्रस्तावित तक्रार निवारण यंत्रणा

| टप्पा | प्रक्रियेचे वर्णन | माध्यम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| GRM अंमलबजावणी रचना | ग्राम कृषी विकास समिती (GKVS) स्तरावर प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची नोंद GKVS कार्यालयात ठेवली जाते. त्यानंतर, GKVS च्या बैठकांमध्ये या तक्रारींवर चर्चा केली जाते आणि त्यावर उपाय शोधले जातात. | ग्राम कृषी विकास समितीच्या नियमित बैठका, अथवा सदर बैठकीमध्ये व्यक्तिशः | ग्राम कृषी विकास समिती |

| टप्पा | प्रक्रियेचे वर्णन | माध्यम | जबाबदारी |
|---|---|---|---|
| | | अथवा सादर केलेल्या लेखी तक्रारी | |
| | तालुका कृषी अधिकारी नोडल अधिकारी म्हणून काम पाहतात तसेच त्यांच्या कार्यालयामार्फत तक्रारींचे निराकरण करणे व त्यानंतर पाठपुरावा व तक्रारदाराचे समाधान ह्यावर लक्ष ठेवले जाते. | व्यक्तीशः, पोस्टाने /ईमेलद्वारे. | प्रकल्प जिल्ह्यां तील तालुका कृषी कार्यालये (TAO). |
| | उपविभागीय कृषी अधिकारी (Sub-Divisional Agriculture Officer - SDAO) हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतात आणि प्रकल्प सहाय्यक त्यांना मदत करतात. तसेच उपविभागीय कृषी अधिकारी (SDAO) त्यांच्या कार्यालयामार्फत तक्रारींचे निराकरण करणे व त्यानंतर पाठपुरावा व तक्रारदाराचे समाधान ह्यावर लक्ष ठेवले जाते. | व्यक्तीशः, पोस्टाने किंवा ईमेलद्वारे. | सर्व प्रकल्प जिल्ह्यांतील उपविभागीय कृषी कार्यालये (SPIU). |
| | जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (District Superintendent Agriculture Officer - DSAO) नोडल अधिकारी म्हणून काम पाहतात आणि प्रकल्प विशेषज्ञ (मानव संसाधन विकास - HRD) त्यांना मदत करतात. तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (DSAO) त्यांच्या कार्यालयामार्फत तक्रारींचे निराकरण करणे व त्यानंतर पाठपुरावा व तक्रारदाराचे समाधान ह्यावर लक्ष ठेवले जाते. | व्यक्तीशः, पोस्टाने किंवा ईमेलद्वारे. | सर्व प्रकल्प जिल्ह्यांतील जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालये (DPIU). |
| | विभागीय कृषी सहसंचालक (Divisional Joint Director of Agriculture - JDA) नोडल अधिकारी म्हणून काम पाहतात आणि त्यांना नोडल अधिकारी मदत करतात. तसेच विभागीय कृषी सहसंचालक (JDA) त्यांच्या कार्यालयामार्फत तक्रारींचे निराकरण करणे व त्यानंतर पाठपुरावा व तक्रारदाराचे समाधान ह्यावर लक्ष ठेवले जाते. | व्यक्तीशः, पोस्टाने किंवा ईमेलद्वारे. | विभागीय कृषी सहसंचालक - अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि लातूर. |

**तक्रार निवारण प्रक्रिया :**

| टप्पा | प्रक्रियेचे वर्णन | जबाबदारी |
|---|---|---|
| क्रमवारी लावणे, प्रक्रिया | कोणतीही तक्रार मिळाल्यानंतर ती ग्राम पंचायतकडे पाठवली जाते, | स्थानिक तक्रार निवारण |

| | | |
|---|---|---|
| करणे | तक्रार नोंदणीमध्ये (Grievance Register) नोंदवली जाते आणि तक्रारीच्या प्रकारानुसार तिचे वर्गीकरण केले जाते. | केंद्रप्रमुख. |
| पावती देणे आणि पाठपुरावा करणे | ग्राम पंचायतकडे द्वारे तक्रार मिळाल्याची पावती तक्रारदाराला दिली जाते. | स्थानिक तक्रार निवारण केंद्रप्रमुख. |
| पडताळणी, तपास, कार्यवाही | ग्राम पंचायतकडे द्वारे तक्रारीची तपासणी केली जाते. GP द्वारे तक्रारीचे निवारण करून त्यांचे निवारण केले जाते. आणि ग्रामपंचायतद्वारे संबंधित तक्रारदाराला तो कळवला जातो. | ग्रामपंचायत सदस्यांची तक्रार समिती. |
| सनियंत्रण आणि मूल्यांकन | तक्रारींविषयीचा तपशील आणि संदर्भ हा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी आणि नोडल अधिकारी (JDA) यांच्यामार्फत तक्रारींचे नोंदणी व निराकरण केले जाते. | संबंधित प्राधिकरण. |
| अभिप्राय देणे | तक्रार निवारणाबाबत तक्रारदारांच्या समाधानाबद्दलचा अभिप्राय ग्रामपंचायतद्वारे गोळा केला जातो. | |
| क्षमता बांधणी प्रशिक्षणे | प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा (PIU), कंत्राटदार आणि पर्यवेक्षण सल्लागार (Supervision Consultants) यांचेसह अधिकारी, कर्मचारी आणि सेवा व सल्लागारांचे आवश्यक विषयासंदर्भात प्रशिक्षणाद्वारे क्षमता बांधणी करण्याचे नियोजित आहे. उदा. : अ) GRM बद्दल जागरूकता, ब) GRM साठी प्रक्रिया आणि क) तक्रारींची नोंदणी आणि अहवाल देणे. | |

**७. सनियंत्रण अहवाल**

नादेकृसं प्रकल्पांतर्गत भागधारकांचा अभिप्राय (feedback), टिप्पण्या व्यवस्थापित करण्यासाठी आणि अहवाल उपलब्ध करून देण्यासाठी पुढील यंत्रणांचा अवलंब करण्यात येईल.:

- ईमेल, वेब पोर्टल आणि दूरध्वनी क्रमांकाद्वारे (telephone numbers) प्राप्त झालेल्या अभिप्रायाची आणि टिप्पण्यांची नोंदणी करून त्यावर वेळेवर कार्यवाही करण्यात येईल.
- जिल्हा प्रकल्प अमलबजावणी कक्ष (DPIU) स्तरावर भागधारक सहभाग आराखडा (SEP) च्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा (periodic review) घेतला जाईल आणि प्रकल्पाच्या प्रगतीचा आलेख व अहवाल राज्य स्तरावरील प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) द्वारे अहवालांमध्ये (periodic progress reports) तो दर्शविला जाईल. तसेच संकलित केलेल्या माहिती प्रकल्प व्यवस्थापन कक्षाद्वारे प्रकाशित केली जाईल. यामध्ये प्रकल्प उद्दिष्टे आणि लक्षांक पूर्ती बाबत ताप्पेनिहाय माहिती,

कामांची स्थिती, आगामी योजना आणि प्राप्त झालेल्या विरुद्ध निराकरण झालेल्या तक्रारींवरील (grievances received versus resolved) माहितीचा समावेश असेल.

· **प्रकल्प खालील निर्देशकांचे (indicators) निरीक्षण करेल:**

- सल्लागार बैठकांची (consultation meetings) आणि इतर चर्चेचे इतिवृत्त व संख्या
- तयार केलेल्या आणि प्रसारित केलेल्या IEC सामग्रीची संख्या आणि प्रकार
- भागधारक सहभाग आरखडा (SEP) अंमलबजावणी, तक्रार निवारण यंत्रणा ( GRM) , कामगार आणि समुदाय आरोग्य आणि सुरक्षा इत्यादींवर आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांची संख्या आणि सहभागींची संख्या (पुरुष/महिला/असुरक्षित आणि वंचित)
- अहवाल कालावधीत प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या आणि प्रकार आणि विहित मुदतीत (prescribed timeline) निराकरण झालेल्यांची संख्या
- तक्रार निवारण यंत्रणा ( GRM), लैंगिक छळ/ शोषण (GBV) इत्यादींवर आयोजित केलेल्या जनजागृती/माहिती प्रसाराच्या उपक्रमांचे प्रकार आणि संख्या
- प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान आयोजित केलेल्या सामुदायिक सल्लामसलतांची संख्या. प्रत्येक सल्लामसलतीत सहभागींची संख्या (लिंगानुसार विभागलेला डेटा)
- प्रकल्प स्थळांवर तक्रार निवारण यंत्रणा (GRM) तपशील प्रदर्शित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या प्रकल्प माहिती फलकांची (information boards) संख्या व योग्य पद्धती.

भागधारक सहभाग आरखडा (SEP) दरम्यान समोर आलेले नवीन मुद्दे, प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान भागधारकांनी उपस्थित केलेल्या समस्या आणि शंकांचा समावेश करणे तसेच अभिप्रायाचा विचार कसा केला गेला आणि प्रकल्पाने त्याचे निराकरण कसे केले याबद्दल देखील माहिती प्रदान करेल.

पर्यावरणीय आणि सामाजिक प्रभाव मूल्यांकनासाठी (environmental and social impact assessments) प्रकल्प उपक्रम सुरु करण्यापूर्वी तपासणी केली जाईल, याकरिता लोक सहभागीय पद्धतीचे तंत्र वापरले जातील. उदा. शिवार फेरी (transect walks), लक्ष्यगट चर्चा इ.

जिल्हा/उपविभाग/तालुका स्तरावर प्रकल्पांतर्गत उपक्रमाची तपासणी, जनजागृती करण्याचे हेतूने सामुदायिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये प्रकल्पांतर्गत लाभार्थी, स्थानिक लोक प्रतिनिधी, (संबंधित जिल्हा अधिकारी, पंचायत नेते आणि महिला), स्थानिक नागरी संघटनांचे (civil society organizations), माध्यम प्रतिनिधी, स्थानिक व्यवसाय आणि प्रकल्पाच्या कार्यालयातील प्रतिनिधी यांचा समावेश असेल. यामध्ये प्रकल्प उपक्रमाची व्याप्ती, अंमलबजावणीची पद्धत आणि अंदाजित खर्च (काही असल्यास), लिंग समानता, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा (occupational health and safety - OHS) आणि पर्यावरणीय आणि सामाजिक जोखीम कमी करण्याच्या उपायांबाबत कंत्राटदाराकडून (contractor) आवश्यक असलेल्या गोष्टी स्पष्ट करतील.

### ७. १ भागधारक गटांना अहवाल देणे

प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान भागधारक सहभाग आराखड्याचे (SEP) वेळोवेळी पुनरावलोकन (review) केले जाईल आणि आवश्यकतेनुसार अद्यावत (updated) केले जाईल. मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापन अहवाल (evaluation reports), तसेच तृतीय-पक्षाचे समवर्ती अहवाल (third- party concurrent reports) सार्वजनिक तक्रारी, चौकशी, संबंधित घटना आणि केलेल्या सुधारात्मक (corrective) किंवा प्रतिबंधात्मक (preventive) उपायांची स्थिती नोंदवतील. याव्यतिरिक्त, प्रकल्प अंतर्गत देखरेख प्रणाली (internal monitoring systems) आणि ICT साधनांद्वारे भागधारक सहभाग आराखडा (SEP) प्रगतीचा मागोवा (track) घेईल. अहवाल तक्रारी आणि माहितीच्या विनंत्यांची संख्या आणि स्वरूप तसेच वेळेवर आणि प्रभावीपणे त्यांचे निराकरण करण्याच्या प्रकल्पाच्या क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी एक यंत्रणा प्रदान करतील. प्रकल्प कालावधी दरम्यान प्रकल्पाने केलेल्या सार्वजनिक सहभाग उपक्रमांची माहिती भागधारकांना पत्रे, माध्यम माहिती (media briefings) इत्यादी विविध मार्गांनी दिली जाऊ शकते.

## ८. परिशिष्ट १ भागधारक सल्लामसलतीचा सारांश

**तक्ता ५: भागधारक सल्लामसलतांसाठी गाव-पातळीवरील कार्यशाळा- टप्पा-II (डिसेंबर ११ ते २४, २०२४)**

| अ क्र. | जिल्हा | कृषी-हवामान विभाग (ACZ) | निवडलेल्या तालुका, गावाचे नाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | तालुका | गाव- १व (कार्यशाळेची तारीख) | गाव- २ व (कार्यशाळेची तारीख) |
| १ | गडचिरोली (PESA आणि PVTG गावे) | HRM (मिश्र मूळ सामग्रीच्या मातीसह जास्त पर्जन्यमान) | गडचिरोली | देवाडा (१३/१२) | कोसम घाट (१२/१२/२०२४) |
| | | | धानोरा | जप्पी (१३/१२) | कुथेगाव (१४/१२/२०२४) |
| २ | यवतमाळ | MR (मध्यम पर्जन्यमान) | आर्णी | केळझरा (१२/१२) | पालोडी (१३/१२/२०२४) |
| | | | झरी जामणी | येडशी (१२/१२) | पारसोडी (१३/१२/२०२४) |
| ३ | जालना | AR (खात्रीशीर पर्जन्यमान) | मंठा | शिरपुरा (१३/१२) | पिंपरी.ता. भोकरदन (११/१२/२०२४) |
| ४ | धाराशिव | SC (दुष्काळग्रस्त क्षेत्र) | परांडा | परांडा (१३/१२) | सारणवाडी (१३/१२/२०२४) |
| | | | वाशी | कडकनाथ वाडी (१३/१२) | म्हसोबाची वाडी (१४/१२/२०२४) |
| ५ | नाशिक १ | TR (संक्रमण) १ | पेठ | शिंगदरी (१२/१२) | रुई पेठ (१३/१२/२०२४) |
| | | | सुरगाणा | वाघधोंड (१३/१२) | भिताघर (१२/१२/२०२४) |
| ६ | नाशिक - २ | TR (संक्रमण) २ | निफाड | तमासवाडी (१३/१२) | चाटोरी (१२/१२/२०२४) |

| अ क्र. | जिल्हा | कृषी-हवामान विभाग (ACZ) | निवडलेल्या तालुका, गावाचे नाव | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | तालुका | गाव- १व (कार्यशाळेची तारीख) | गाव- २ व (कार्यशाळेची तारीख) |
| | | | चांदवड | | आसारखेडे (१३/१२/२०२४) |

(टीप: कंसातील आकडे कार्यशाळेची तारीख दर्शवतात)

**भौगोलिक आणि लोकसंख्याशास्त्रीय व्याप्ती**

डिसेंबर २०२४ मध्ये गडचिरोली, यवतमाळ, धाराशिव, जालना आणि नाशिक या ५ जिल्ह्यांतील १२ ब्लॉकमधील २१ गावांमध्ये सहा कृषी-पर्यावरणीय विभागांमध्ये सल्लामसलत (consultations) आयोजित करण्यात आली. गडचिरोली आणि यवतमाळमधील आदिवासीबहुल PESA/PVTG गावे तसेच नाशिक आणि जालनामधील दुष्काळप्रवण आणि संक्रमण क्षेत्रांकडे विशेष लक्ष देण्यात आले. ६८० हून अधिक भागधारक प्रतिनिधींनी भाग घेतला, ज्यामुळे लिंग, जात आणि आर्थिक स्थितीचे व्यापक प्रतिनिधित्व सुनिश्चित झाले.

**मुख्य विषय आणि निष्कर्ष**

१. **हवामान बदल आणि कृषी क्षेत्रातील जोखीम :**सर्व कार्यशाळांमध्ये, शेतकऱ्यांनी हवामानातील वाढत्या बदलांची नोंद केली, ज्यात खालील बाबींचा समावेश आहे:

- अनियमित किंवा अपुरा पाऊस, विलंब, दीर्घकाळ कोरडे हवामान (१५-४५ दिवस) व ढगफुटी.
- बेमोसमी पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे नुकसान आणि आर्थिक ताण.
- लहान जमिन धारकांचे घटलेले पीक उत्पादन आणि वाढलेली असुरक्षितता, विशेषत: पावसावर आधारित शेतीवर अवलंबून असणारे.
- अनुकूलन धोरणे: काही शेतकऱ्यांनी लवकर तयार होणाऱ्या किंवा दुष्काळ-प्रतिरोधक पीक वाणांचा वापर करण्यास सुरुवात केलीय, परंतु जनजागृतीच्या अभावामुळे व्यापक अवलंब मर्यादित आहे.

२. **कीड आणि रोग व्यवस्थापन**

- रासायनिक कीटकनाशकांवर जास्त अवलंबित्व नोंदवले गेले, २५-५०% उत्पादन खर्च कीटक नियंत्रणावर येतो.
- बहुतेक शेतकऱ्यांना सुरक्षित कीटकनाशक वापर, योग्य डोस आणि जैविक पर्यायांचे ज्ञान नाही.
- कीटकनाशकांच्या कंटेनरची अयोग्य विल्हेवाट आणि संरक्षणात्मक उपकरणांचा अभाव सामान्य होता, ज्यामुळे आरोग्य आणि पर्यावरणास धोका निर्माण झाला.
- एकात्मिक कीड व्यवस्थापन (integrated pest management - IPM) किंवा सेंद्रिय कीड नियंत्रण पद्धतींचा कमी अवलंब.

### ३. ऊर्जा आणि सिंचन आव्हाने

- वारंवार वीज खंडित होणे आणि डिझेलच्या उच्च किमतीमुळे सिंचनात अडथळा येतो.
- अनेक लहान धारकांना पाण्याच्या पंपांसाठी विश्वसनीय ऊर्जा स्त्रोतांपर्यंत पोहोच नाही.
- सौर पंपांना मागणी असूनही जास्त प्रारंभिक खर्च व मर्यादित अनुदानामुळे अवलंब मर्यादित आहे.
- काही गावांमध्ये, सिंचन केवळ रात्री शक्य आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना विजेचा धक्का आणि वन्यजीव encounters सारख्या धोक्यांचा सामना करावा लागतो.

### ४. वन्यजीव संघर्ष आणि पीक संरक्षण

- जंगली प्राण्यांमुळे (जंगली डुक्कर, हरण, हत्ती, नीलगाय, माकडे) पिकांचे नुकसान ही एक व्यापक समस्या आहे, विशेषत: जंगलाजवळील गावांमध्ये.
- शेतकऱ्यांनी वन्यजीवांपासून शेतांचे संरक्षण करण्यासाठी तारेचे किंवा सौर कुंपण (solar fencing) उभारण्यासाठी अनुदानाची मागणी केली.
- भरपाई यंत्रणेच्या अभावामुळे वन्यजीवांमुळे होणारे नुकसान वाढते.

### ५. महिलांचा सहभाग आणि उपजीविका विविधीकरण

- महिला स्वयंसहायता गट (SHG) सक्रिय आहेत, परंतु उत्पन्न-निर्मिती उपक्रमांसाठी त्यांच्याकडे संसाधनांचा अभाव आहे.
- महिलांनी कौशल्य विकास, आर्थिक सहाय्य आणि कृषी-संबंधित उद्योगांसाठी (उदा. शेळीपालन, कुक्कुटपालन) समर्थनाची मागणी केली.
- नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचे प्रतिनिधित्व मर्यादित आहे, जरी प्रकल्प गाव समित्यांमध्ये अनिवार्य कोट्यांद्वारे (quotas) हे सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

### ६. पीक अवशेष आणि सेंद्रिय पद्धती

- कंपोस्टिंग (composting) साधने आणि ज्ञानाच्या अभावामुळे बहुतेक शेतकरी पिकांचे अवशेष जाळतात, ज्यामुळे पर्यावरणीय ऱ्हास होतो.
- अवशेष व्यवस्थापनास (residue management) मदत करण्यासाठी विघटनशील एजंट्स (decomposer agents), व्हर्मीकंपोस्ट बेड (vermicompost beds) आणि यंत्रसामग्री (उदा. कापूस श्रेडर (cotton shredders)) साठी जोरदार मागणी आहे.
- सेंद्रिय निविष्ठा आणि विस्तार समर्थनाची उपलब्धता मर्यादित असल्याने सेंद्रिय शेतीचा अवलंब मर्यादित आहे.

## ७. पायाभूत सुविधा आणि उपकरणांची आवश्यकता

- शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर, स्प्रेअर, विहिरी, साठवण सुविधा आणि वाहतूक वाहनांसाठी अनुदानाची मागणी केली.
- सुधारित साठवण (पॅकहाउस, कांद्याची शेड), जलसंधारण रचना (शेती तलाव) आणि बाजारात प्रवेशाच्या पायाभूत सुविधांची (market access infrastructure) गरज आहे.
- मागील योजनां (schemes) अंतर्गत बांधलेली अनेक सिंचन आणि साठवण मालमत्ता गाळाने भरलेली (silted) आहेत किंवा नादुरुस्त (disrepair) आहेत, त्यामुळे त्यांची देखभाल आणि श्रेणीसुधार करणे आवश्यक आहे.

## ८. अपेक्षा आणि शिफारशी

भागधारकांनी प्रकल्प टप्पा-२ कडून स्पष्ट अपेक्षा व्यक्त केल्या, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:

- हवामान-लवचिक बियाणे आणि तंत्रज्ञानाचा प्रवेश.
- अनुकूल विस्तार सेवा आणि प्रशिक्षण (विशेषतः शेतकरी शेती शाळांच्या माध्यमातून).
- पत, विमा आणि सरकारी योजनांमध्ये सुधारित प्रवेश.
- पारदर्शक आणि सर्वसमावेशक लाभ वितरण, असुरक्षित गटांवर (महिला, SC/ST, भूमिहीन) विशेष लक्ष केंद्रित करणे.
- FPO आणि सामूहिक मूल्य साखळी उपक्रमांना (collective value chain initiatives) मजबूत करणे.

## ९. प्रकल्प आराखड्यात एकत्रीकरण

या सल्लामसलतांमधील (consultations) अभिप्राय आणि शिफारशी टप्पा-२ प्रकल्प आराखड्यामध्ये पद्धतशीरपणे एकत्रित केल्या आहेत. प्रमुख प्रतिसादांमध्ये (responses) खालील गोष्टींचा समावेश आहे:

- सौर सिंचन, जलसंधारण आणि वन्यजीव-प्रतिरोधक कुंपणाला (wildlife-proof fencing) प्राधान्य देणे.
- कृषी-संबंधित आणि गैर-शेती उपजीविकेसाठी (non-farm livelihoods) समर्थन वाढवणे, विशेषतः महिला आणि भूमिहीन कुटुंबांसाठी.
- सुरक्षित कीटकनाशक वापर, सेंद्रिय शेती आणि हवामान अनुकूलनावर क्षमता-निर्माण कार्यक्रम सुरू करणे.
- गाव नियोजन संस्थांमध्ये महिलांचे ५०% प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे आणि महिलांच्या नेतृत्वाखालील FPO/SHG ला प्रोत्साहन देणे.
- आदिवासी आणि दुर्गम समुदायांसह सर्वांसाठी सुलभ (accessible) तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करणे.
- विशिष्ट गावानुसार (village-specific) गरजांवर आधारित लक्ष्यित अनुदान (targeted subsidies) आणि पायाभूत सुविधा समर्थन प्रदान करणे.

# प्रकल्प व्यवस्थापन कक्ष

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
30ब, आर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
मुंबई, महाराष्ट्र ४००००५

https://mahapocra.gov.in